
शनिवार, ९ डिसेंबर २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - ११९
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SATURDAY 9 DECEMBER. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-03 ●ISSUE-119 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-10 ●PRICE-05



श्रीनगरमधील दललेक सरोवराच्या एका बेटावरील बगीचाचे सोलापूर येथील सुप्रसिध्द उद्योगपती किशोर चांडक यांनी शुक्रवारी सकाळी घेतलेले मनमोहक छायाचित्र.

### चर्चेतली बातमी

## माजी मुख्यमंत्री चंद्रशेखर राव रुग्णालयात

आधुनिक केसरी न्यूज

**हैदराबाद :** तेलंगणाचे माजी मुख्यमंत्री आणि बीआरएसचे प्रमुख के. चंद्रशेखर राव हे त्यांच्या फार्महाऊसवर पाय घसरुन पडल्याने त्यांना सोमाजीगुडा येथील यशोदा रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. गुरुवारी रात्री उशिरा इरावल्ली येथील त्यांच्या फार्महाऊसमध्ये ते पाय घसरुन पडले. त्यामुळे केसीआर यांच्या कंबरेला मार बसला आहे. केसीआर यांची प्रकृती सध्या स्थिर आहे, असे डॉक्टरांनी सांगितले आहे. आज त्यांच्या काही चाचण्या केल्या जाणार आहेत. त्यांना हिप फ्रॅक्चर झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे. तसेच त्यांच्या डाव्या पायाला गंभीर इजा झाली आहे असेही डॉक्टरांनी स्पष्ट केले आहे. तेलंगणाचे माजी मुख्यमंत्री केसीआर हे गुरुवारी त्यांच्या फार्महाऊसवर गेले होते. तिथे बाथरुममध्ये गेले असता त्यांचा पाय घसरला आणि ते पडले. त्यामुळे त्यांच्या कंबरेचे हाड मोडलं आहे. त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आल्यानंतर काही वेळातच रुग्णालयाने मेडिकल बुलेटीनही जारी केले. सध्याच्या घडीला केसीआर यांच्यासह त्यांचे कुटुंबीय आणि पक्षाचे काही लोक आहेत. तेलंगणाच्या निवडणुकीचा निकाल रविवारी लागला. केसीआर हे त्यांच्या फार्महाऊसवर गेले असता ही घटना घडल्याचे समोर आले आहे.

## मार्च एंडपर्यंत कांदा निर्यातबंदी

### मुंबई - आग्रा महामार्गावर रास्ता रोको : पोलिसांचा लाठीमार

आधुनिक केसरी न्यूज

**किरणकुमार आवारे**

**निफाड : केंद्र सरकारने दि. ३१ मार्च २०२४ पर्यंत कांद्यावर निर्यातबंदी करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे नाशिक जिल्ह्यात कांद्याचे भाव दोन हजार प्रति क्विंटलने खाली आले, त्यामुळे शेतकऱ्यांनी संतप्त होत बाजार समित्या बंद पाडल्या तर मुंबई आग्रा महामार्गावरील चांदवड व उमराणे येथे महामार्ग रोखण्यात आला. चांदवड येथे आंदोलकांवर पोलिसांनी सौम्य लाठीमार केला त्यामुळे आंदोलक अधिकच संतप्त झाले.**

दि.३१ मार्च २०२४ पर्यंत कांदा निर्यात बंदीचा निर्णय घेऊन केंद्र सरकारने शेतकऱ्यांच्या जखमेवरती मीठ चोळले आहे. संपूर्ण महाराष्ट्रात अवकाळी पाऊस व गारपीट झाली. यामध्ये शेती उध्वस्त झाली कांद्याचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान झाले अशा अस्मानी संकटाच्या काळात सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहील अशी अपेक्षा होती. परंतु मदत करणं राहिले बाजूला वरून शेतकऱ्यांवरती घाव घालण्याचे काम केंद्र सरकारने दोन दिवसात केले आहे. इथेनॉलनिर्मितीवर निर्बंध व कांद्याची निर्यात बंदी शेतकऱ्यांना उध्वस्त करणारी आहे. हा निर्णय केंद्र सरकारने तात्काळ मागे घ्यावा.
**- संदीप जगताप, प्रदेशाध्यक्ष, स्वाभिमानी शेतकरी संघटना**

नाशिक जिल्ह्यातील चांदवड, उमराणे, पिंपळगाव बसवंत, लासलगाव, विंचूर, मुंगसे, मनमाड, येवला, नांदगाव येथे कांद्याला अवघा १२०० ते १५०० रुपये प्रति क्विंटल भाव मिळाल्याने शेतकऱ्यांनी लिलाव थांबवले. संतप्त शेतकऱ्यांनी चांदवड व उमराणे येथे मुंबई-आग्रा महामार्ग रोखून धरला. कांद्याचे भाव नियंत्रणात ठेवण्यासाठी दि.२८ ऑक्टोबर रोजी कांद्यावरील निर्यात मूल्य दर ८०० डॉलर प्रति टन करण्याचा निर्णय केंद्राकडून घेण्यात आला होता. दि.३१ डिसेंबर पर्यंत एमइपी ८०० डॉलर प्रति टन ठेवण्यात आले होते. मात्र दि.८ डिसेंबर २०२३ रोजी पुन्हा वाणिज्य विभागाने नोटिफिकेशन काढून कांद्यावर निर्यात बंदी लादली आहे. दि.३१ मार्च २०२४ पर्यंत कांदा निर्यातबंदी राहणार आहे. गेल्या हंगामात पावसाने पाठ फिरवल्याने तसेच काढणीला आलेल्या कांद्याला अवकाळीचा फटका बसल्याने कांदा आवक घटली आहे. पुन्हा कांदा दरावर अंकुश राहण्यासाठी निर्यात बंदी लावली असल्याचे समजते. मागील काही दिवसांपासून नाशिक जिल्ह्यातील लासलगाव सह जिल्ह्यातील बाजार समित्यांमध्ये कांद्याच्या दरात चांगली सुधारणा होत कांद्याला चार हजार रुपये प्रति क्विंटलपर्यंत बाजारभाव मिळत होते, परंतु केंद्र सरकारने कांद्याची निर्यात बंदीची अधिसूचना काढल्यामुळे आज सकाळी सर्व बाजार समित्यांमध्ये कांद्याच्या बाजारभावात १५०० ते २००० रुपयांची घसरण झाल्यामुळे केंद्र सरकारने घेतलेल्या कांदा निर्यात बंदीच्या निर्णयाचा कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी जोरदार निषेध केला आहे.

महाराष्ट्रातील नगदी पीक म्हणून कांदा या पिकाकडे पाहिले जाते. या देशाचे अर्थकारण या पिकांवर असले तरी या पिकांना केंद्र सरकारच्या आयात निर्यात धोरणाचा नेहमीच फटका बसत आला आहे. त्यामुळे कांदा उत्पादक बेजार झाले आहेत. चांगले उत्पन्न आल्यानंतर सरकारचे धोरण आणि व्यापाऱ्यांची एकाधिकारशाहीमुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. यावर्षी केंद्र सरकारने कांदा निर्यातीवर अवास्तव शुल्क लावले त्यामुळे ही अघोषित निर्यातबंदी असल्याने शेतकऱ्यांना या निर्णयाचा फटका बसला त्यातच व्यापाऱ्यांनी बाजार समित्या बंद ठेवल्या त्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात आर्थिक नुकसान झाले. यावर्षी उन्हाळ कांदा संपुष्टात आला असून अत्यल्प पर्जन्यमान असल्याने रांगडा कांद्याचे देखील अल्प उत्पादन आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हातात काही उरणार नाही. त्यातच केंद्र सरकारने कांद्यावर निर्यात बंदीचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे केंद्र सरकारचा हा निर्णय म्हणजे कांदा उत्पादकांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली असून अल्पावधीतच सरकारला शेतकऱ्यांचा उद्रेक पहायला मिळणार आहे.

## फडणवीसांची भूमिका बदलली का : अंधारे

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** नवाब मलिक यांचा राजीनामा घ्यावा, अशी महाविकास आघाडीकडे मागणी करणाऱ्या उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संजय राठोड यांचा राजीनामा का घेतला नाही. मलिक अल्पसंख्यांक असल्यामुळे फडणवीस यांची भूमिका बदलली का, अशी विचारणा ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी येथे शुक्रवारी केली. भ्रष्टाचाराचे आरोप असलेले नवाब मलिक यांनी अजित पवार गटाला समर्थन दिल्याचे विधिमंडळाच्या अधिवेशनात दिसून आले होते. त्याचे तीव्र राजकीय पडसाद उमटले. त्यानंतर सत्तेपेक्षा देश महत्त्वाचा आहे. त्यामुळे महायुतीमध्ये मलिक नकोत, असे पत्र उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अजित पवार यांना दिले. या पार्श्वभूमीवर अंधारे यांनी पत्रकार परिषदेत फडणवीस यांच्यावर टीका केली. फडणवीस यांना उशिरा विवेकवाद कसा आठवला, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. अजित पवार आणि नवाब मलिक यांच्यामध्ये दोन ते तीन भेटी झाल्या होत्या. मात्र मलिक यांचा विषय काढण्यामागील राजकारण वेगळे आहे. अधिवेशनात मराठा आरक्षण, धनगर आरक्षणावर चर्चा होण्याची आवश्यकता आहे. मात्र मलिक प्रकरणावर पुढील तीन ते चार दिवस चर्चा होईल. सत्तेपेक्षा देश मोठा, हा विवेकवाद फडणवीस यांना उशिरा सुचला आहे. भावना गवळी, प्रताप सरनाईक, अर्जुन खोतकर, प्रफुल्ल पटेल, हसन मुश्रिफ यांची निर्दोष मुक्तता झालेली नाही. तरीही ते सत्तेत महत्त्वाच्या पदावर आहेत. मनोज कंबोजसारखी व्यक्ती पुढे केली जाते.


## शेतकऱ्यांनाच पैसे देण्यास टाळाटाळ का? : नाना पटोले

आधुनिक केसरी न्यूज

नागपूर : राज्यातील शेतकरी मोठ्या संकटाला तोंड देत असताना राज्य सरकारची भूमिका मात्र वेळकाढूपणाची दिसत आहे. शेतकऱ्यांवर अवयव विकण्याची परिस्थिती आली आहे. सरकार फक्त भरपूर दिले भरपूर दिले अशा घोषणा करते पण शेतकऱ्यांना काहीच मिळालेले नाही. सरकार सभागृहात चर्चा करण्यास तयार आहे तर मग चर्चा का घेत नाही. सभागृहात आज शेतकरी प्रश्नांवर चर्चा होणार नसेल तर आम्हाला चर्चेत रस नाही. राज्यावर ७ लाख कोटी रुपयांचे कर्ज लादले ते कर्ज शेतकऱ्यांकडूनच वसूल करणार मग शेतकऱ्यांना पैसे देण्यास टाळाटाळ का? असा संतप्त सवाल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. विधानसभेतील चर्चेत शेतकऱ्यांचा प्रश्न उपस्थित करत नाना पटोले म्हणाले की, शेतकरी प्रश्नांवर सभागृहात आजच चर्चा करा केली पाहिजे. आम्ही शेतकरी, जनतेच्या प्रश्नावर चर्चा करण्यासाठी येथे आलो आहोत, गोंधळ घालायला आलो नाही, आम्हालाही गोंधळ घालून कामकाज बंद पाडता आले असते पण आम्हाला चर्चा करायची आहे. कापूस, धान, संत्रा, सोयाबीन, द्राक्ष, कांदा, दूध उत्पादक शेतकरी कोणीच समाधानी नाही, त्यांचे मोठे नुकसान झाले आहे त्यावर आजच चर्चा करा. सरकार चर्चा करण्यास तयार आहे, आम्ही तयार आहोत तर मग वेळ कशाला? सरकारने पावसाळी अधिवेशनात ४१ हजार कोटी रुपयांच्या पुरवण्या मागण्या मंजुर केल्या आता पुन्हा ५६ हजार कोटींच्या पुरवण्या मागण्या आहेत. सत्ताधारी पक्षांच्या आमदारांना कोट्यवधींचा निधी दिला जातो आणि विरोधी पक्षांच्या आमदारांकडे दुर्लक्ष केले जाते. विरोधी पक्षाचे आमदार या राज्यातील नाहीत का? आम्ही बाहेरच्या राज्यातून आलो आहोत का? असे प्रश्नही पटोले यांनी उपस्थित केले.



विधिमंडळ परिसरात प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी भारतीय जनता पक्ष व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर तोफ डागली. ते पुढे म्हणाले की, नवाब मलिकांना दाऊदशी संबंधीत असल्याचे सांगत देवेंद्र फडणवीस यांनी आपण किती देशप्रेमी आहोत हे दाखवण्याचा केविलवाणा प्रयत्न केला, त्यासंदर्भात त्यांनी दुसरे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना पत्र लिहून ते पत्र ट्वीटही केले पण दाऊदचा साथीदार इक्बाल मिर्चीचा पार्टनर खासदार प्रफुल्ल पटेल देवेंद्र फडणवीस यांना कसे चालतात? ईडीने प्रफुल्ल पटेल यांचे घरही जप्त केलेले आहे मग प्रफुल्ल पटेलांबद्दल फडणवीस यांची भूमिका काय? ते फडणवीसांनी जाहीर करावे. कुख्यात माफिया दाऊद इब्राहिमशी संबंधित एक व्यक्ती देशद्रोही तर मग दुसरा व्यक्ती देशप्रेमी आहे का?





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

महापुरुष हे देखील शेवटी माणसेच असतात. त्या त्या परिस्थितीत निर्णय घेताना त्यांच्या हातून कदाचित काही चुका होऊ शकतात. पण म्हणून त्यांच्या महत्वाच्या कार्याकडे दुर्लक्ष करून त्यांचे दोष किंवा चुकाच आपण दाखवत राहायच्या हे कितपत योग्य आहे ? अलीकडे महापुरुषांच्या कार्याचे, गुणांचे गुणगान करण्यापेक्षा त्यांच्यातील दोष दाखवण्याचा जो पायंडा पडत चालला आहे, तो भविष्यकाळाच्या दृष्टीने घातक आहे. पुढच्या पिढ्यांसमोर आपण आदर्श ठेवायचा की दोष दिग्दर्शन करायचे ? स्वा. सावरकर असोत, गांधी किंवा नेहरू असोत या सगळ्या महापुरुषांनी देशासाठी प्रचंड त्याग केला आहे, अपार कष्ट, तुरुंगवास सोसला आहे. अमुक एका महापुरुषावर टीका केली म्हणजे तो लहान होत नाही किंवा त्याच्या कार्याचे महत्व कमी होत नाही. पुलं हे महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्व. पुलंनी अवघ्या महाराष्ट्राला सुसंस्कृत विनोद कसा असतो हे दाखवून दिले. नाट्य, संगीत, अभिनय, दिग्दर्शन, लेखन इ कलेच्या विविध प्रांतात सहज संचार करणारा अवलिया म्हणजे पुलं. याच पुलंवर मध्यंतरी एक चित्रपट येऊन गेला. ' भाई -व्यक्ती आणि वल्ली ' या नावाचा. आपल्यापैकी बऱ्याच पुलं प्रेमींनी तो पाहिला असेल. पण या चित्रपटातून पुलंचे अष्टपैलू व्यक्तिमत्व समोर येण्याऐवजी सतत धूम्रपान करणारे, मद्यपान करणारे पुलं अशीच व्यक्तिरेखा डोळ्यासमोर येते. कदाचित वस्तुस्थिती तशी असेलही आणि दिग्दर्शकाला काय दाखवायचे याचे स्वातंत्र्यही नक्कीच आहे. पण इथे पुन्हा माझ्यातील शिक्षक जागृत होतो. समाजापुढे आपण काय ठेवतो आहोत याचा विचार नक्कीच करायला हवा असे मला तीव्रतेने वाटते. वाईट गोष्टी लगेच उचलल्या जातात. चांगल्या गोष्टी रुजवायला वेळ लागतो. उतारावरून गाडी वेगाने खाली येते. वर चढण्यासाठी कष्ट पडतात. आपल्याला समाजाची गाडी प्रगतीच्या दिशेने न्यायची असेल तर योग्यायोग्यतेचा विवेक ठेवायलाच हवा.



## आनंदी पहाट

## जीवन कौशल्ये आत्मसात करावीत

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

जीवन कौशल्ये हे शिकून आणि प्रत्यक्ष जीवन अनुभवाद्वारे प्राप्त केलेल्या मूलभूत कौशल्यांचा संच असतात. ही कौशल्ये व्यक्ती, गटांना दैनंदिन जीवनात येणाऱ्या समस्या आणि समस्यांना प्रभावीपणे सामोरे जाण्यास सक्षम करतात. त्यामध्ये सर्जनशीलता, गंभीर विचार, समस्या सोडवणे, निर्णय घेणे, संप्रेषण आणि सहयोग कौशल्ये तसेच चांगल्या नागरिकत्वासाठी योगदान देणारी वैयक्तिक आणि सामाजिक जबाबदारी यांचा समावेश असतो. ही सर्व एकविसाव्या शतकातील दोन्ही निरोगी समाजासाठी यशस्वी आणि रोजगारक्षम व्यक्तींच्या यशासाठी आवश्यक कौशल्ये आहेत. आपल्याला यशस्वी जीवन जगायचे असल्यामुळे आपण जीवन कौशल्याचे मूल्य समजून घेतले पाहिजे. आपल्या दैनंदिन जीवनात ते आचरणात आणणे देखील महत्त्वाचे आहे. त्यामुळे आपले जीवन सोपे होईल आणि योग्य दिशेने निर्देशित केले जाईल. जीवन कौशल्ये आपल्याला आपले जीवन सोपे कसे बनवायचे, सकारात्मक जीवन कसे जगायचे आणि आपला वेळ हुशारीने कसा उपयोगात आणायचा हे शिकवते. परिणामी, जीवन कौशल्ये आपल्या जीवनात आवश्यक आहेत. ही कौशल्ये विविध परिस्थितींशी जुळवून घेण्याची आणि समाजाच्या सर्व पैलूंमध्ये यशस्वी होण्याची क्षमता वाढवतात. भावी पिढ्यांच्या आयुष्यातील जीवन कौशल्याची कमतरता दूर करणे अत्यंत आवश्यक आहे. जीवन कौशल्याच्या कमतरतेमुळे केवळ वैयक्तिक जीवनच नाही, तर व्यावसायिक जीवन आणि करिअर देखील महत्वाचे असते. मुलांना जीवन कौशल्यांचे महत्त्व पटवून देणे आवश्यक आहे. त्यांच्या मानसिक, शारीरिक, भावनिक आणि आर्थिक गरजांची काळजी कशी घ्यावी, हे त्यांनी लवकर शिकले पाहिजे. मुलांना अंक लिहिणे, मोजणे आणि शब्दलेखन करणे, हे शिकवणे जितके महत्त्वाचे आहे; तितकेच तरुणांना शाळेत जीवन कौशल्ये शिकवणे आवश्यक आहे. निरोगी जीवनशैली आणि निरोगी मनाला प्रोत्साहन देतात.



आधुनिक केसरी

### मौन सिध्द होते | ब्रह्मरूप ||

सत्कर्माचे ठायी | भयास न थारा ||
पापाचा निचरा | होत जातो ||१||
संचिताचा पाया | पुण्याचा संचय ||
निष्काम अजय | वर्म जाण ||२||
भुतदया भाव | जागता अंतरी ||
सुखी तो संसारी | सर्वकाळ ||३||
नको प्रतारणा | नको निंदा द्वेष ||
हरिनाम घोष | कर्मासंगे ||४||
संत संगतीने | कर्म शुद्ध होते ||
मौन सिध्द होते | ब्रह्मरूप ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८


## निरुपण

आधुनिक केसरी

दुःखें सर्वांग फुटलें ।नासिक अवघेंचि बैसलें ।
लक्षण जाऊन जालें ।कुलक्षण ॥१९॥
देहास क्षीणता आली ।नाना वेथा उद्भवली ।
तारुण्यशक्ती राहिली ।खंगला प्राणी ॥२०॥
सर्वांगीं लागल्या कळा ।देहास आली अवकळा ।
प्राणी कांपे चळचळां ।शक्ति नाहीं ॥२१॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

जीवन डोरी आप से, दीजे सद्गुरु हाथ ।
ढार वृत्ति गुरु भाव में, जीवन सद्गुरु साथ ।।०४।।(स्वर्वेद पंचम मण्डल पंचम अध्याय) ०५/०५/०४
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
आपल्या जीवनाची दोरी सद्गुरूंच्या हातात देऊन आपला स्वभाव गुरूंच्या विचारांच्या अनुकूल करून त्यांच्या शरणात राहिले पाहिजे.




स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## रामदास स्वामी

आधुनिक केसरी




जेथे होईल हे प्रांत ( शेवट ) । तेथे भजतील हो भक्त । उत्साह चाफळी अद्भुत । राहील तेव्हा ।। 'आम्ही चाफळास जाण्याने श्री रघुवीराच्या उपासनेकडे लोकांचे दुर्लक्ष होऊ लागेल यासाठी कोठेही आता जाणे नको; 'म्हणौनी सज्जनगडी वास । आम्हास करणे सावकास । जे होईल देहास । ते येथे घडे ।।' अशाही स्थितीत पौषमासी ( मार्गशीर्षाचा क्षयमास होता ) डोमगावहून कल्याण स्वामी आले. त्यांनी लिहिलेली दासबोधाची प्रत तपासून दिली. आमची प्रतिज्ञा ऐसी । काही न मागावे शिष्यासी । आपणामागे जगदीशासी । भजत जावे ।।' ही शेवटची ओवी करून ती १२-१० मध्ये घातली.'मध्यरात्री साहावे तासी । समर्थ पाहती त्या मूर्तीसी । मेण होते जे नयनासी । ते काढविले ।।

## पैसा नीतिधर्माने मिळवावा

आधुनिक केसरी

काळजीचे काही कारण नसताना काळजीत राहण्याचे काहींना व्यसन असते. व्यवहारात काळजी हा मोठा विकल्प आहे. पैसा असल्यामुळे जर काळजी वाटू लागली, तर तो पैसाच दूर केला तर नाही का चालणार ? पैसा टाकून देऊ नका, पण पैशाच्या प्रेमातही राहू नका. जिवापाड श्रम करून जो कमवायचा, तोच जर दुःखाला कारण होऊ लागला तर काय उपयोग ? पैसा काही आयुष्याचे सर्वस्व नव्हे, किंवा सर्वश्रेष्ठ ध्येय नव्हे. व्यवहारामध्ये जीवनाला पैसा आवश्यक आहे; आणि तो नीतीने वागून आपल्या पोटापुरता कमावणे जरूर आहे. पैसा मिळावा हे व्यवहारदृष्ट्या योग्यच आहे, पण जर तो मिळाला नाही तर आपले जीवन व्यर्थ आहे असे कोणी समजू नये. पैसा आला तर तो भगवंताच्या इच्छेने आला, आणि यदाकदाचित् तो गेला, तर भगवंताच्या इच्छेने गेला, असे म्हणून, आपले समाधान बिघडू देऊ नये. पैसा गेला म्हणून काही अब्रू जात नाही; आपली अब्रू आपल्या आचरणावर अवलंबून असते. अशी म्हण आहे की, 'पैसा पुरून उरावा इतका



मिळावा.' पण आपल्याला जगात काय आढळते ? जीवनामध्ये पैसा आपल्याला पुरतो आणि आपल्या उरावर नाचतो. हे काही ' पुरून उरणे ' नव्हे. याच्या उलट, आपण त्याला पुरावे आणि त्याच्या छातीवर नाचावे. मनुष्य नेहमी म्हणतो की, ' माझ्या मुलाबाळांची तरतूद मला केली पाहिजे; मी काय, आज आहे आणि उद्या नाही. ' पण आपण जसे खात्रीचे नाही, तशी आपली मुलेबाळे तरी कुठे खात्रीची आहेत ? ही गोष्ट माणसाच्या लक्षातच येत नाही.
पैशाबद्दल रामचंद्राला उदासपण आले, असे योगवासिष्ठात वर्णन आहे. तसे ते आपल्यालाही लागू आहे; फरक एवढाच की, रामाचे उदासपण पैसा ' असणेपणाचे ' होते, आणि आपले उदासपण पैसा 'नसणेपणाचे ' आहे. पैसा नसल्याबद्दल आपल्याला उदासपण आहे, कारण तो प्रपंचातल्या सुखाचे साधन वाटते. पण त्याबरोबरच भगवंत हवा असेही आपल्याला वाटते. आता, आपण आपल्या पैशाचे बरोबर दोन भाग करू. आपल्याला प्रपंचाला लागेल इतका पैसा प्रामाणिकपणे मिळवून आपण जगावे. जास्तीची हाव करू नये. हा झाला आपला पैसा; अर्थात्, राहिलेला सगळा दुसऱ्याचा. त्याचा लोभ करू नये. श्रीमंत मनुष्य हा पैशासाठी, म्हणजे लक्ष्मीसाठी, सर्व जीवन खर्च करतो. पण ती त्याचा मुळासकट नाश करते. म्हणून, नारायणाच्या स्मरणात लक्ष्मी मिळविली, की ती आपला नाश न करता, आपल्या आनंदाला कारण होते.
**२५१. पैसा हा नीतिधर्मानेच मिळवावा; तो वाटेल त्या मार्गाने मिळवणे इष्ट नाही.**

## गुणरूप

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

स्थापनेपासून आज शताब्दी महोत्सवापर्यन्तचा प्रवास हा काही सहजासहजी झालेला नाही. अनेक वादळवा-याला तोंड देत.ही संस्था भक्कम पायावर ऊभी आहे. सामाजिक व सांस्कृतिक, अध्यात्मिक परिवर्तन होण्यासाठी इ,स,१९२४ साली गीता वाचस्पति,प्रज्ञाचक्षु कै, सदाशिवशास्त्री भिडे व लोकमान्यांचे नातू पत्रकार महर्षी कै,ग.वि केतकर यांच्या पुढाकाराने गीता धर्ममंडळाची स्थापना झाली. गीता जगावं कसं हे शिकवते? समाजाला हे समजणे फार गरजेचे आहे. त्यासाठी समाज एकत्र आला पाहिजे. असे हे समाजभान असणारे मंडळाचे कार्यकर्ते हे प्रगल्भ विचार घेऊन सुरवातीला अवघ्या दोन खोल्यांत चालवलेल्या धर्मकार्याचा हा महायज्ञ अखंड चालू आहे. आज त्याने शंभरी पार करून तो दिमाखात उभा आहे. गीताधर्म मंडळाची वास्तू प्रत्येक भारतीयाला प्रेरणास्थान आहे.



मूलं मोठी होताना... पालक म्हणून माझी जबाबदारी पान ६

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

शनिवार, ९ डिसेंबर २०२३

adhunikkesari.com Adhunik Kesari


# सोलापुरात कांदा लिलाव न झाल्याने शेतकरी रस्त्यावर



आधुनिक केसरी न्यूज

**सोलापूर :** एकीकडे केंद्र सरकारने कांदा निर्यातीवर निर्बंध आणल्यामुळे त्याविरोधात शेतकरी आणि व्यापारीवर्गात असंतोष कायम असताना राज्यातील कांद्याची प्रमुख बाजारपेठ असलेल्या सोलापूर कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये शुक्रवारी मोठ्या प्रमाणावर कांदा दाखल झाला. परंतु कांदा लिलाव बंद राहिल्यामुळे शेतकऱ्यांनी तीव्र संताप व्यक्त करीत कृषि उत्पन्न बाजार समिती प्रशासन व व्यापाऱ्यांच्या विरोधात सोलापूर-पुणे व हैदराबाद महामार्ग रोखण्याचा प्रयत्न केला. नंतर कृषि उत्पन्न बाजार समितीच्या प्रशासकीय इमारतीसमोर ठिय्या आंदोलन केले. गेल्या ६ डिसेंबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनी कांदा लिलाव बंद ठेवण्यात आला होता. मुळातच कांदा दरात घसरण सुरू असताना काल गुरूवारी ८६ हजार ८०१ क्विंटल इतक्या मोठ्या प्रमाणात कांदा दाखल झाला होता. यात कमाल पाच हजार रूपये आणि सर्वसाधारण दर २६०० रूपये मिळाला होता. दरात सुमारे तीनशे रूपयांची घसरण झाली असताना आज शुक्रवारी तेवढ्याच प्रमाणात कांद्याची आवक झाली. परंतु व्यापाऱ्यांनी कांदा खरेदी करण्यास नकार दिला. कांदा लिलाव अचानकपणे बंद ठेवण्यात आल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये गोंधळाची स्थिती निर्माण झाली.

सोलापूर जिल्ह्यातील सर्वदूर भागासह पुणे, नगर, सांगली तसेच मराठवाडा आणि शेजारच्या कर्नाटकातील शेतकऱ्यांनी मोठा वाहतूक खर्च करून कांदा आणला होता. परंतु कांदा लिलाव होणार नसल्याची कोणतीही पूर्वसूचना नसल्यामुळे शेतकऱ्यांची अडचण झाली. त्यातूनच संतापलेले शेतकरी रस्त्यावर आले होते.

## हरभऱ्यावरील अळीच्या नियंत्रणासाठी कृषी विभागाचा पुढाकार

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** तालुक्यामध्ये रब्बी हंगामात सर्वाधिक हरभरा पिकाची पेरणी झाली आहे. मात्र नुकतेच झालेल्या अवकाळी पावसामुळे पाने खाणाऱ्या अळीचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव हरभऱ्यावर झालेला दिसून येत आहे.यामुळे शेतकरी हैराण झालेला आहे. यावर योग्य ते फवारणी करण्याच्या सूचना तालुका कृषी अधिकारी सुरेंद्र पवार यांनी दिल्या आहेत.



धर्माबाद तालुक्यात लागवडीयोग्य क्षेत्र १७९५५ हेक्टर आहे.त्यापैकी यंदा रब्बी हंगामात १८४५७ हेक्टर क्षेत्रात पेरणी झालेली आहे. यामध्ये सर्वाधिक पेरणी हरभऱ्याची झाली असून तब्बल १५९५४ हेक्टर क्षेत्रात लागवड करण्यात आली आहे. मात्र रब्बी हंगामातील मुख्य पीक असलेल्या हरभऱ्यावर मररोगाचा प्रादुर्भाव आढळून येत आहे. तसेच हरभरा पिकासोबत खरीप हंगामातील सोयाबीन, उडीद मोठया प्रमाणात उगवलेली दिसत आहे. नुकतेच धर्माबाद तालुक्यात ४१.३० मिमी अवकाळी पावसाची नोंद झालेली आहे.या कालावधीत झालेला आहे.

या कालावधीमध्ये ढगाळ वातावरण व सकाळी धूक्याचे प्रमाण जास्त वाढल्याने पाने खाणाऱ्या अळीस पोषक वातावरण निर्माण होऊन त्याचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर झालेला दिसून येत आहे. यामुळे शेतकरी ही हैराण झालेला होता. या समस्येवर नियंत्रणासाठी मराठवाडा कृषी विद्यापीठाचे शास्त्रज्ञानी क्विनलफॉस २५ ईसी २० मीली किंवा इमामेक्टीन बेंझोएट ५ टक्के किंवा ४ ग्रॅम, कोरॅनट्रानीलीप्रोल १८.५ एससी किंवा २.५मि.ली. फ़ल्युबेन्डामाईड २० डब्ल्युजी किंवा ५ ग्रॅम, फ़ल्युबेन्डामाईड ३९.३५ % डब्ल्युजी किंवा २ मीली,नोवाल्यूरॉन १०.०० % ईसी किंवा १५ मि.ली इथिऑन ५० ईसी किंवा २० मि.ली.,नोवाल्यूरॉन ५.२५ टक्के + इन्डॉक्झाकार्ब ४.५ % एस सी १७मि.ली,जमिनी लगत रोप कुरतडणारी अळीसाठी कोरपायरिफॉस २० टक्के २५ मि. ली.फवारणी करण्याची शिफारस केली आहे.

कृषी विद्यापिठाच्या शास्त्रज्ञानी केलेल्या शिफारशीनुसार वरील औषधापैकी एका औषधाची फवारणी करावी, तसेच पहिल्या फवारणीनंतर दुसरी फवारणी घेताना औषधामध्ये बद्दल करून फवारणी करावी असे आव्हान तालुका कृषी अधिकारी सुरेंद्र पवार यांनी केले आहे.



## ‘होय! हे असंच आहे!’ आणि ‘मधुशाला’ या काव्यसंग्रहाच्या चतुर्थ आवृत्तीचे रविवारी प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** केशव भवानी काळे लिखित ‘होय! हे असंच आहे!’ आणि हरिवंशराय बच्चन यांच्या ‘मधुशाला’ या काव्यसंग्रहाचा केशव भवानी यांनी केलेल्या भावांतराच्या चतुर्थ आवृत्तीचा प्रकाशन सोहळा रविवार, दि. 10 डिसेंबर 2023 रोजी ख्यातनाम चित्रपट निर्माते व चाटे समूहाचे सर्वेसर्वा प्रा. मच्छिंद्र चाटे यांच्या शुभहस्ते संपन्न होणार आहे. ज्येष्ठ संपादक यमाजी मालकर यांचे यावेळी मार्गदर्शन लाभणार असून शासकीय विद्यानिकेतनचे सेवानिवृत्त शिक्षक मानसिंग पाटील हे या कार्यक्रमाचे अध्यक्ष असतील. मौलाना आझाद संशोधन केंद्र, मजनू हिल, छत्रपती संभाजीनगर येथे होणाऱ्या या कार्यक्रमाला शहरातील रसिक प्रेक्षकांनी आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन लेखक केशव भवानी काळे यांनी केले आहे.








## सुवर्णपदक मिळवलेल्या मल्लांचे युवा नेते राम भदाणे यांनी केले अभिनंदन

आधुनिक केसरी न्यूज

**संकेत बागरेचा**

**नेर :** नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र राज्य स्टेअर्स फाउंडेशन राज्यस्तरीय राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत धुळे तालुक्यातील मल्लांनी यश संपादन करून दिल्ली येथे होणाऱ्या नॅशनल कुस्ती स्पर्धेसाठी पात्र ठरले आहेत.

सोलापूर येथे संपन्न झालेल्या कुस्ती स्पर्धेमध्ये धुळे तालुक्यातील न्याहळोद व कापडणे येथील मल्लांनी यश संपादन केले. यामध्ये अशोक संजय पाटील 61KG वजन गटांमध्ये सुवर्णपदक, अक्षरा संजय भोई 50KG वजन गटांमध्ये सुवर्णपदक, कुमकुम संजय भिल 38 KG वजन गटांमध्ये सुवर्णपदक, हितेश धनराज कोळी 30KG वजन गटांमध्ये रजत पदक, महेश भील 38 KG वजन गटांमध्ये रजत पदक ,प्रेम मालचे 46KG रजत पदक, सिद्धार्थ वाघ 55 KG मध्ये रजत पदक, गौरव सैंदाणे 38KG मध्ये रजत पदक, ललित पाटील 71 KG मध्ये कास्यपदक मिळविले. सर्व उपस्थित मल्लांचा सत्कार धुळे ग्रामीण भाजपा विधानसभा प्रमुख, जिल्हा परिषद सदस्य मा.राघवेंद्र (रामदादा) पाटील यांच्या हस्ते नगाव येथील मुख्य कार्यालयात करण्यात आला व दिल्ली येथे होणाऱ्या पुढील स्पर्धेसाठी सर्व मल्लांना शुभेच्छा दिल्या.

## पंतप्रधानांचे आवाहन

आधुनिक केसरी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी उत्तराखंडमध्ये आयोजित दोन दिवसीय ग्लोबल इन्व्हेस्टर्स समिटचं उद्घाटन केलं. या परिषदेत भारतासह जगभरातील गुंतवणूकदार आणि आंतरराष्ट्रीय कंपन्यांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित आहेत. या परिषदेच्या उद्घाटनाच्या भाषणात नरेंद्र मोदी यांनी भारतातल्या परदेशी गुंतवणुकीवर भाष्य केल. तर उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी म्हणाले, आम्ही या परिषदेसाठी आलेल्या गुंतवणूकदारांबरोबर २.५ लाख कोटी रुपयांच्या सामंजस्य करारांवर स्वाक्षरी करण्याचं लक्ष्य ठेवलं आहे. आतापर्यंत ४४,००० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीवर यशस्वी बोलणी झाली आहे. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, देवभूमी उत्तराखंड तुम्हा सर्वांसाठी नवे दरवाजे उघडत आहे. भारताचा प्रगतीचा मंत्र घेऊन उत्तराखंड पुढे सरकत आहे. या महत्त्वकांक्षी भारताला स्थिर सरकार हवं आहे. नुकत्याच झालेल्या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीत आपण तेच पाहिलं आहे. लोकांनाही स्थिर आणि मजबूत सरकर हवं आहे. हीच गोष्ट उत्तराखंडच्या जनतेने आधीच दाखवून दिली आहे. नरेंद्र मोदी यांनी उत्तराखंडला परफेक्ट वेडिंग डेस्टिनेशन (विवाह करण्यासाठीचं उत्तम ठिकाण) म्हटलं आहे. पंतप्रधान मोदी म्हणाले, मी या देशातल्या धनाढ्य लोकांना सांगू इच्छितो की, लोकांची लग्न होतात, तेव्हा त्यांच्या जोड्या ईश्वराने बनवलेल्या असतात, असा आपला समज आहे. परंतु, मला एक गोष्ट कळत नाही की, देव लोकांच्या जोड्या बनवतो तर मग या जोड्या त्यांच्या आयुष्याची सुरुवात करण्यासाठी (डेस्टिनेशन वेडिंग करण्यासाठी) परदेशात का जातात? ते इथे देवभूमीवर लग्न का करत नाहीत? देवाच्या दारात लग्न करण्याऐवजी परदेशात का जातात? पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, मला असं वाटतं की, आपल्या देशांमधील तरुणांसाठी 'मेक इन इंडिया' योजना आहे. त्याचप्रमाणे 'वेड इन इंडिया' ही चळवळ सुरू व्हायला हवी. आपल्या देशातले धनाढ्य तरुण जगभरातल्या इतर देशांमध्ये जाऊन लग्न का करतात? आपल्या देशातल्या धनाढ्य लोकांमध्ये परदेशात जाऊन लग्न करण्याची फॅशन सुरू झाली आहे. इन्व्हेस्टर्स समिटमध्ये आलेल्या गुंतवणूकदारांना पंतप्रधान मोदी म्हणाले, तुम्ही सर्वचजण उत्तराखंडमध्ये गुंतवणूक करू शकाल असं नाही. काही जण गुंतवणूक करू शकणार नाहीत. परंतु, तुम्ही तो गुंतवणुकीचा विषय बाजूला सारा. कारण सगळ्यांनाच ते शक्य होणार नाही. परतु, मला वाटतं की येत्या पाच वर्षांमध्ये तुमच्या कुटुंबातील कमीत कमी एक डेस्टिनेशन वेडिंग उत्तराखंडमध्ये करा. एका वर्षांत ५,००० लग्नं जरी इथे होऊ लागली तरी नव्या पायाभूत सुविधा इथे उभ्या राहतील. जगभरातील लोकांसाठी हे एक मोठं वेडिंग डेस्टिनेशन बनेल. भारताकडे इतकी ताकद आहे की, आपण मिळून ठरवलं तर ते सहज शक्य होईल. कारण आपण तितके सामर्थ्यवान आहोत.

## अमृतकाळातही भ्रष्टाचारी मोकाट कसे ?

आधुनिक केसरी

**भ्रष्टाचार ही देशाला लागलेली कीड आहे. ती ठेचली पाहिजे. असे सर्वच राजकीय पक्ष म्हणत असतात. ही घासून गुळगुळीत झालेली टेप ऐकून लोकांना वैताग आला आहे. भ्रष्टाचार करणारेच प्रिय आहेत असा संदेश या पूर्वी वेळीवेळी देशात पोचत राहिला आहे. त्यामुळे प्रामाणिक लोकांनी कोणाकडे पाहायचे हा प्रश्न आहे ? महागाईच्या दिवसांत कुटुंबातील मंडळींचे पोषण करण्यासाठी सामान्य माणूस दिवस रात्र मेहनत करत आहे. मुलांचे शिक्षण, वैयक्तिक अथवा कुटुंबातील सदस्यांचे आजारपण. यांवर होणारा खर्च कमी होण्याऐवजी वाढत असतो. या सर्व उलाढालीत अवतीभवती काय चालू आहे ? याकडे लक्ष देण्यास लोकांना वेळ नाही. जीव जगवण्यासाठी राबत राहणे हेच जीवनाचे ध्येय झाले आहे. त्याप्रमाणे वागणे चालू आहे, असे वाटते.**

मात्र भ्रष्टाचार करणाऱ्या भ्रष्ट लोकांची तर चंगळच असते असे म्हणावे लागेल. आधी साधी सेकंड हँड सायकल घेण्याची पात्रता नसणारा माणूस लोकप्रतिनिधी झाल्यावर लाखो - करोडो रुपयांच्या गाड्यांतून फिरू लागतो. अशी कोणती मेहनत त्याने केलेली असते ? हे काही कळत नाही. ५ वर्षांत ज्या वेगाने आर्थिक घोडदौड होते ती तर डोळे विस्फारणारी असते. यांना जे मासिक वेतन मिळते त्यात तर मोठी आर्थिक झेप घेणे अशक्य आहे. मग ही झेप की झडप कशावर टाकली जाते ? की जिथे यांना खजिनाच मिळतो आणि ते मालामाल होतात. बर, झटापट मालामाल होण्याचा हा फॉर्म्युला काय आहे ? तो मात्र गुपितच ठेवला जातो. जनाची नाही मनाची नाही तर कसलीच लाज न बाळगता भ्रष्टाचार करणारे ताठ मानेने समाजात फिरू तरी कसे शकतात ? सामान्य माणसाने बँकेतून रीतसर कर्ज घेतलेले असले तरी ते फेडून पूर्ण होइपर्यंत त्याला चैन पडत नाही. आपण कोणाचे तरी देणे लागतो ही जाणीव त्याला कायम बेचैन करत असते. भ्रष्ट्राचारी माणसाला केवळ लुबाडणेच ठाऊक असल्याने देण्याचा आणि त्याचा विचार करण्याचा प्रश्नच नसतो. मेहनत न घेता सर्व मलाच मिळावे आणि विलासी जीवन जगावे हेच त्याला पक्के ज्ञात असते. विकासाची नवनवीन स्वप्ने दाखवून विनाविलंब ती प्रत्यक्षात उतरवण्यासाठी काय करता येईल ? याचा अभ्यास करून चोख नियोजन केले जाते आणि पुढे मग थाटामाटात याचे उदघाटन सोहळे पार पडतात. असे करत विकासाच्या दिशेने वाटचाल ठेवली जाते आणि त्याला कुठे अटकाव होणार नाही याची काळजी घेतली जाते. असे आहे तर मग भ्रष्टाचार निर्मुलन गांभीर्याने का घेतले जात नाही ? सूर्य - चंद्र यांच्या दिशेने झेपावणारा भारत भ्रष्टाचार आणि भ्रष्टाचार करणारे यांच्यावर झडप घालण्यात पुष्कळ मागे आहे. असे चित्र आहे. त्यामुळे भ्रष्टाचाराचे उच्चाटन झाले असे कोणीही छातीठोकपणे सांगूच शकत नाही.

आपली राजकिय कारकीर्द संपुष्टात येऊ नये, कमावलेली मोहमाया जप्त होऊन बदनामी होऊ नये याची काळजी घेणारे आणि वेळीच सुरक्षित पैलतीरी जाणारे महाराष्ट्राने आणि देशाने पाहिले आहेत. यावरून विरोधक कितीही रान उठवत असले तरी त्यांना भीक न घालता त्यांना सुरक्षित किनाऱ्यावर आसरा देऊन त्यांच्यावर जबाबदारीही दिली जात आहे, हे तर विशेषच म्हणावे लागेल. राजकीय कारकीर्द सुरक्षित - लोकांच्या तोंडचा घास हिसकावून हडप केलेली मोहमायाही सुरक्षित आणि पुढे स्वतः नाहीतर कुटुंबातील सदस्याला निवडणूकीचे तिकीट मिळवून देत त्याला निवडून आणून लोकांत ताठ मानेने फिरायलाही मोकळे. कुठे नेऊन ठेवला आहे भारत ?

भ्रष्टाचाराचे उच्चाटन करणे सहज शक्य आहे. त्यासाठी भ्रष्टाचार करणाऱ्या लोकांचा भक्कम राजकिय आधार होणे जो पर्यंत पूर्णतः थांबत नाही तो पर्यंत भ्रष्टाचार करणारे ताठ मानेने फिरतच राहाणार. तुमच्यामुळे कोणाचेही अडत नाही आणि अडणार नाही. उलट तुम्हीच कधीही तुमच्यावर असलेल्या भ्रष्टाचाराच्या आरोपांखाली कधीही अडकू शकता. हा संदेश भ्रष्टाचाराने बरबटलेल्या भ्रष्ट मंडळींपर्यंत गेला पाहिजे. पण यात सोयीस्कर खेळी नसावी. स्थानिक स्वराज्य संस्था - लोकसभा - विधानसभा यांच्या निवडणुका घोषित झाल्यावर इतरांप्रमाणे आपणही सुरक्षित पैलतीर गाठू शकतो हा फाजील आत्मविश्वास भ्रष्टाचारी मंडळींचे बलस्थान आहे. असे वाटते. आज जरी वातावरण आपल्याला अनुकूल असे नसले तरी निवडणुका घोषित झाल्यावर प्रतिकूल वातावरण आपसूकच अनुकूल होईल



आणि सर्वकाही आपल्याला अनुकूल असेच घडेल अशी स्वप्ने पाहत घुडघ्याला बाशिंग बांधून असणारे कित्येक जण असतील. हा आत्मविश्वास यांच्यात कोणामुळे आला ? याचे उत्तर जनतेला ज्ञात आहे. आधी भ्रष्टाचारी म्हणून आरोप करायचे. मग पहाटेचे शपथविधी काय आणि मग ते फिसकटल्यावर काही कालावधीने पुढे सत्तेत बसण्याचा मान काय. अहो, लोकांच्या तोंडाला किती पाने पुसणार ? लोकसेवा करण्यासाठी राजकारणात आहात की लोकांना असलेला त्रास कमी म्हणून त्यात भर टाकत राहून राजकिय चिखल करण्यासाठी राजकारणात आहात. नक्की स्वतःची उपयुक्तता तरी काय ?

तुम्ही तुमच्या कारकिर्दीत अमुक यांना जवळ केले मग आम्ही जर अमुक यांना जवळ केले तर का झोंबते ? असले वाक्यांचे शेलके खेळ बिनकामाचे आहेत. याने भ्रष्टाचाराचे निर्मूलन होणार नाही. तर भ्रष्टाचार करणारे अधिक शक्तीशाली होतील. यांना शक्तीहीन झालेले जनतेला पाहायचे आहे. पुन्हा मंत्री म्हणून भ्रष्टाचार करणाऱ्या नेत्यांना लोकांवर लादने म्हणजे प्रामाणिकपणाचा गळा घोटणे होय. अशी निर्दय कामे करून लोकांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे दुष्कर्म करणे लांच्छनास्पद आहे.

२० लाख रुपयांची खंडणी घेताना अंकित तिवारी या ईडीच्या भ्रष्टाचारी अधिकाऱ्याला तमिळनाडू पोलिसांनी ताब्यात घेणे त्या संस्थेच्या कार्यपद्धतीवर कैक प्रश्न निर्माण करते. असे किती भ्रष्ट अधिकारी त्या संस्थेत असतील ? आणि त्यांनी आतापर्यंत किती जणांकडून पैसे गोळा करण्याचे म्हणजे भ्रष्टाचार करण्याचे काम केले असेल ? हे समोर आले पाहिजे. लोकांना याची उत्सुकता आहे. सुरक्षित पैलतीर गाठण्यासाठी ईडी नावाच्या नौकेचा उपयोग झाला. मात्र तिचा एक नावाडीच लाचखोर आहे. हे जगजाहीर झाले आहे. त्यामुळे या संस्थेची पूर्ती बदनामी तर झालीच. पण यांनी आधी केलेल्या कारवाया कशा केल्या असतील ? याविषयी दाट संशय आहे. कुंपणच शेत खात आहे. त्यामुळेच भ्रष्टाचार करणारे मोकाट आहेत असे समजायचे का ? म्हणजे त्यांना ईडीचे भयच राहिलेले नाही. विरोधक या संस्थेच्या नावे आधीपासूनच बोंबा मारत आहेत. त्या सत्यच म्हणाव्या लागतील. आधी उच्च शिक्षण घेण्यासाठी नंतर नोकरीत स्थिर होण्यासाठी - व्यवसायात जम बसवण्याठी सामान्य लोक रक्ताचे पाणी करत आहेत. तरीही अपेक्षित असे घवघवीत यश सर्वांच्या पदरी पडतेच असे मुळीच नाही. कारण आहे वाढती स्पर्धा. त्यामुळे सामान्य माणसाचे जीवन यंत्रमानवाप्रमाणे झाले आहे. सुखाने चार घास खायचे आहेत तर आढेवेढे न घेता पदरी जे काम पडेल ते निमूटपणे करत राहायचे. हाच जीवनाचा सिद्धांत घेऊन आला दिवस पुढे रेटला जात आहे. प्रमाणिकपणे राबणाऱ्या या लोकांचा कर कापून जात वेतन हाती पडते. मात्र भ्रष्टाचार करणारे आणि कर यांचा दुरान्वयेही संबंध येत नाही. लोकांनी कर भरायचा आणि भ्रष्टाचार करणाऱ्यांनी त्यावर डल्ला मारत स्वतःची संपत्ती निर्माण करायची. हेच चालू आहे. अमृतकाळात तरी हे थांबेल असे कुठेतरी वाटत होते. पण कसले काय ? इकडचे भ्रष्टाचारी तिकडे जाऊन निवांत विश्रांती घेत चिंतामुक्त जीवनाचा मनमुराद आस्वाद घेत आहेत.

राजकिय गणिते जुळवण्यासाठी विरोधकांवर कशाप्रकारे कुरघोड्या केल्या जाऊ शकतात हे दाखवण्यासाठी भ्रष्टाचारी नेत्यांना पायघड्या घालून त्यांच्या समोर माना तुकवणारे कधीतरी लोकांना स्वच्छ कारभार करणारे प्रामाणिक लोकप्रतिनिधी मिळवून देऊ शकतील का ? हा सामान्य जनतेच्या रोकडा प्रश्न आहे. आधीच्या सत्ताधारी मंडळींनी काय केले ? त्यामुळे कारभाराचा गाडा हाकण्यासाठी नाईलाजाने जनतेत नाराजी असलेल्या लोकप्रतिनिधिंनाही आपलेसे करावे लागणे. इतकी कोणती नामुष्की आली होती ? ज्यामध्ये लोकांना गृहीत धरून मनमानी केली गेली. पूर्वानुभव लक्षात घेता ताकाला जाऊन भांडे लपवण्यासाठी आटोकाट प्रयत्न करणाऱ्यांना आता जनताच धडा शिकवेल. कारण तिला भ्रष्टाचार, भ्रष्टाचारी आणि त्यांना आश्रय देणारे सत्ताधारी - विरोधी यांचा उबग आला आहे. प्रभू श्रीराम सत्य - एक वचनी होते. तसेच नीतीनियमांचे काटेकोर पालन करणारे मर्यादा पुरुषोत्तम असे आदर्श राजा - पुत्र होते. त्यांचे किती गुण त्यांचे गुणगान गाणाऱ्या नेत्यांनी घेतले आहेत ? ते जनतेसमोर आहे. भ्रष्टाचार रूपी रावणाचा खरच अंत करायचा आहे की त्याच चिखलात खितपत पडून राजकारणाचा विचका करायचा आहे ? प्रभू श्री रामाचे नाव पुढे करून कार्य ( लोकसेवा ) त्याप्रमाणेच झाले तर कोणाला नको आहे ? मात्र आता तशी स्थिती दिसत नाही. हे वास्तव आहे.

**जयेश राणे**
**मुंबई**

## किर्ती अमर होण्यासाठी चरित्र निर्माण व्हावं लागतं



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**प्रसिद्धीने कधीचं किर्ती अमर होत नाही त्यासाठी चरित्र निर्माण व्हावं लागतं. एकदा का चरित्र निर्माण झालं कि मग किर्ती आपोआप अमर होते. प्रसिद्ध हि क्षणिक क्षणभंगुर असते पण चरित्राने निर्माण झालेली किर्ती हि शाश्वत असल्याने अमर होत असते. प्रसिद्धी हि अशाश्वत, अस्थिर असते तरी देखिल आपण ती मिळण्यासाठी अनंत नानाविधी प्रयत्न करतो. खरया अर्थाने कधीतरी अंतर्मुख होऊन विचार केला तर नक्कीच आपल्याला स्वतः च हसु आल्याशिवाय रहाणार नाही. किती मोठ्या प्रमाणात आपण प्रसिद्धी च्या आहारी गेलो आहेत.म्हणजे प्रसिद्धी मिळविण्यासाठी किती धडपडतोय वेळ प्रसंगी आपण प्रसिद्ध होण्यासाठी कोणत्याही टोकाला जाण्यासाठी तयार आहेत म्हणजे किती विचित्र स्थिती निर्माण झाली आहे.**

प्रसिद्ध होण्यासाठी जीव देखील धोक्यात घालण्याची मानसिकता असुन त्याच प्रदर्शन आपण सोशल माध्यमातून पाहतोय. प्रसिद्धी हा नवीन आजार आहे असं कहिस जाणवायला लागल तर आहेच पण हा आजार दिवसेंदिवस खुप झपाट्याने फोफावत आहे हे अगदी वास्तव असुन हि गंभीर बाब समस्या आहे.याच दरम्यान चरित्र निर्माण होऊन अजर अमर होणारी व शाश्वत असणारी किर्ती यापासून मात्र आपण कोसो दुर जात आहोत हे खरंच किती भयानक वास्तव असुन विलक्षण असा विरोधाभास देखिल आहे.खरं तर सृष्टी वर चरित्राने निर्माण होणारी किर्ती हि अमर असणारी एकमेव बाब आहे .मरावे परी किर्ती रूपी उरावे असं बोललं जातं.पण ते कृतीत आणण्यासाठी खुप कमी लोक प्रयत्नशील असतात.आध्यत्मिक ज्ञान मार्ग ,सत्यनिष्ठ आचरण, सात्विकता,निस्वार्थ वृत्ती,हे जीवनातील चरित्र निर्माण होण्यासाठी चे मुख्य आधारस्तंभ असून सतसंग हे चरित्र निर्माण होण्यासाठी चे प्रभावी माध्यम आहे. चरित्र निर्माण होण्यासाठी आध्यत्मिक ज्ञान मार्गा हा उत्तम मार्ग आहे.ज्यांनी ज्यांनी आपल्या जीवनात या मार्गच अनुकरण केल.त्यांचं त्यांचं जीवन किर्ती रूपी अमर झाले हे दृष्टी सत्य आहे.म्हणून जीवनात मिळवण्या सारखी कोणती महत्वाची संपदा जर काही असेल तर ती संपदा किर्ती रूपी आहे. त्यासाठी आपल्याला आपलं चरित्र घडवता आलं पाहीजेच जीवनात आपण मोठे झालो पाहिजेत हि प्रत्येक व्यक्तिची मनोमन इच्छा असते .पण मोठं होतं असताना पैशाने ,पदाने, प्रसिद्धी ने संपत्तीने मोठं होता येण काहीच अवघड नाही.पण अवघड आहे ते स्व



किर्तीने अजर अमर होण किर्ती हि प्रसिद्धी ने नाही तर चरित्राने अमर होत असते.म्हणून चरित्र निर्माण होणं गरजेचं आहे.आणि प्रसिद्धीने मोठं होऊन काही दिवसांनी पुन्हा मुळ स्थानी येण्यापेक्षा आपण आपलं चरित्र निर्माण करण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. जेणेकरून एकदा चरित्र निर्माण झाल कि पिढ्या न पिढ्या किर्ती अमर रहते . म्हणून क्षणिक असणारी प्रसिद्ध न मिळवता अमर असणार चरित्र निर्माण करता आला पाहिजे.हिच जीवनातील सगळ्यात महत्वाची गोष्ट संपदा आहे.चरित्र निर्माण हि सृष्टीच्या रचनेतील सगळ्यात महत्वाची बाब आहे .एकदा का चरित्र निर्माण झालं कि मग चारित्र्याच्या अनुषंगाने किर्ती निर्माण होते आणि चरित्राने निर्माण झालेली किर्ती हि अजर अमर असते.प्रसिद्धी हा वेगळा विषय असुन ती मिळावावी लागते. आणि जितक्या कालखंडात आपण प्रसिद्धी मिळवू तितक्याच दिवस ती आपल्या सोबत राहते.म्हणजे प्रसिद्धी हि नश्वर क्षणभंगुर असते .प्रसिद्धी हि चंचल अस्थिर असल्याने मिळविण्यासाठी अहोरात्र धडपड करावी लागते. पण एकदा का चरित्र निर्माण झाल तर ते लाखो लोकांच्या साठी प्रेरणास्रोत ठरत. आणि भविष्यातील कित्येक पिढ्यांसाठी प्रेरणादायी प्रेरणास्रोत निर्माण होतो. म्हणून क्षणिक क्षणभंगुर प्रसिद्धी मिळविण्यासाठी आपला अमुल्य वेळ व्यर्थ घालविण्यापेक्षा आपण सतसंगात राहुन आपलं चरित्र निर्माण केल पाहिजे. जे आपल्या सह इतरांच्या साठी कल्याणकारी असेल. शाश्वत अमर राहिल असं चरित्र निर्माण व्हावं म्हणून दैनंदिन जीवनात प्रयत्न करणं अंतिमतः उपयोग ठरत त्यासाठी सतसंग हा अंत्यंत लाभकारी ठरतो.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



# जनार्दन कसारे खून खटल्यात सरकारी वकील नियुक्त करा

## मातंग समाजाचे विभागीय आयुक्त कार्यालयात आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**छत्रपती संभाजीनगर :** पिसादेवी येथील जनार्दन कोंडीबा कसारे खुन प्रकरणी राज्य सरकारने राजकीय दबावाला बळी न पडता विशेष सरकारी वकील नियुक्त करण्याच्या मागणीसाठी आज (ता.०७) विभागीय आयुक्त कार्यालय येथे धरणे आंदोलन करण्यात आले, आंदोलना नंतर विभागीय उपायुक्त गव्हाने यांची भेट घेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन पाठविण्यात आले.

या निवेदनात म्हटले आहे की, छत्रपती संभाजीनगर शहराजवळ असलेल्या पिसादेवी येथील जनार्दन कोंडीबा कसारे यांचा दिनांक १८/०८/२०२२ रोजी निर्घृण खून करण्यात आला होता, या प्रकरणात विशेष सरकारी वकील श्री. राजेंद्र जी मुगदीया साहेब यांची नियुक्त करण्याची मागणी सकल मातंग समाज व कसारे परिवाराच्या वतीने निवेदनाद्वारे करण्यात आली होती, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालयाने या संदर्भात पोलीस महासंचालक यांच्या मार्फत राज्य सरकार (गृहमंत्री, महाराष्ट्र) कडे विशेष सरकारी वकील नियुक्त करण्यासंदर्भात प्रस्ताव पाठविला होता मात्र राज्य सरकारने (गृहमंत्री कार्यालय) या प्रकरणी विशेष सरकारी वकील नियुक्त करण्यास स्पष्ट शब्दात नकार दिला आहे, राज्य सरकार ने अनुसूचित जाती जमाती अन्याय अत्याचार प्रतिबंधक कायदा (ऑट्रॉसिटी) ची प्रभावी अंमलबजावणी करायला हवी मात्र राज्यात सरकार विरोधात जनमत तयार होत असल्याने राज्य सरकार अन्यायग्रस्त परिवाराच्या बाजुने उभे राहण्या ऐवजी हल्लेखोर आरोपीना मदत करत आहे, हा अन्याय ग्रस्तावर एक प्रकारचा सामाजिक अन्यायच आहे, जनार्दन कोंडीबा कसारे खुन प्रकरणी विशेष सरकारी वकील नियुक्त करण्यासंदर्भात राज्य सरकारने पुनर्विचार करावा आणि जनार्दन कसारे खुन प्रकरणी विशेष सरकारी वकील मा. राजेंद्र जी मुगदीया साहेब यांची नियुक्ती करण्यात यावी अशी मागणी मुख्यमंत्र्यांकडे करण्यात आली आहे, या निवेदनावर सकल मातंग समाजाचे समन्वयक संतोष पवार, मानवहित लोकशाही पार्टीचे सुनील मोटे (अण्णा), वंचित बहुजन आघाडी चे युवा नेते विनोद कसारे, लहु प्रहार संघटनेचे नितीन आव्हाड, पँथर राहुलभाई भालेराव, विक्की शेजवळ, भारतीय दलित संसद चे विलास खोतकर, राहुल घोरपडे, मनिष कांबळे, मनोहर नाडे, सागर शेजवळ, कैलास शिंदे, निखिल गोफणे, प्रिन्स कसारे, भाऊसाहेब औचरमल, उमेश त्रिभुवन, अशोक नाडे, नारायण गुढेकर जनार्दन कसारे यांच्या पत्नी कलाबाई कसारे, मुलगा साईनाथ कसारे, सोमनाथ कसारे, वंदना कसारे, पुजा कसारे, सविता नाडे, आदींची नावे आहेत, मागणीकडे दुर्लक्ष झाल्यास दी. १३/११/२०२३ रोजी नागपूर येथे हिवाळी अधिवेशना दरम्यान आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# अंतरवाली सराटी येथे संदीप महाराज जाधव यांचे हरीकीर्तन

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** सकल मराठा, जन समुदायच्या बनाने, सकल मरान क्रांनी मोर्चेचा संघर्ष योद्धा मा, मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषनार्थ सकल मराठा समाज तसेच समस्त खुलताबाद तालुक्यातील सम्पूर्ण वारकरी संप्रदायातील भजनी मंडळाच्या वतीने व बोडखा गावातील ग्रामस्थांच्या वतीने मराठा समाजाला आरक्षण मीळावे म्हणुन दि03-12-2023 रविवार या दिवशी ह.भ.प. महादेव महाराज गिरी व ह.भ.प. गणेश महाराज बोचरे यांच्या अध्यक्षतेखाली अंतरवाली सराटी येथे रात्री 8:30 ते 10:30 या वेळेत आदरणीय हभप संदिप महाराज जाधव यांची हरी किर्तन सेवा झाली तेव्हा गाव कामगार मोलिस पाटील संघटना प्रमुख माजी पोलिस पाटील रामदास भाऊराव गुकवने (कोठाळा) रायभान पाटील सोनवने विद्यमान पोलिस पाटील बोडखा) मा. श्रीमंत राव गुरुवने पाटील गजानन साखर कारखाना संचालक मा, चंद्रिमान माने पाटील (मान यारवाडी, बीड) ह, भ, पश्री गणेश महाराज गुंजकर (कोनका) ह,भ, पश्री संदिप महाराज शौरसाल, रामदास भाऊराव गुळवने (गाव कामगार पोलिस पाटील संघटना जालना जील्हा प्रमुख) श्रीमंतरावा बाळाभाऊ गुळवने संतोष मरकड (हसनापुर)मा, चंद्रभान माने पाटील संदिप महाराज शइरसआठ (हसनापुर) गणेश महाराज गुंजकर (कोठाळा)व समस्त अंतरवाली सराटी गावातील ग्रामस्थ व समस्त अंतरवाली गावातील ग्रामस्य व पंचाणीतून आलेले समस्त गावकरी मंडळी व अन्यभजनी मंडळी उपस्थित होते.






# मुलीच्या वाढदिवसानिमित्त पोस्टातील सुकन्या समृद्धी योजनेचे उघडले खाते

आधुनिक केसरी न्यूज


**फुलंब्री :** वडोद बाजार येथील सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार उमेश गवळी यांनी आपल्या मुलीच्या वाढदिवसानिमित्त पोस्टातील सुकन्या समृद्धी योजनेत खाते उघडले. तसेच गुरुकुल इंग्लिश स्कूल येथे शालेय विद्यार्थ्यांना बिस्किट वाटप करून 'बेटी पढाव 'बेटी बचाव' मुलगी शिकली प्रगती झाली, असे विविध संदेश देत.अनेक उपक्रमांनी वाढदिवस साजरा केला. यावेळी उत्तम गवळी, लताबाई रतन गवळी, कोकिळा उमेश गवळी, राणी शुभम गवळी, सुनील गडवे, किशोर घायतिलक, संतोष अहिरे, गणेश इंगळे, राहुल गवळी, संजय सोनवणे, सुभाष मस्के, ऋषिकेश म्हस्के, रमेश पंढरे, रवी मस्के आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

















# मूलं मोठी होताना... पालक म्हणून माझी जबाबदारी



तृप्ती नितीन तोडकर
संपर्क क्र. 9322506052

आधुनिक केसरी

**एकविसाव्या शतकात वावरत असताना प्रत्येक जण आधुनिकतेच्या विळख्यात अडकलेला दिसतो आहे. लहानांना लवकर मोठं व्हायचंय आणि मोठ्यांना जे त्यांच्या काळात जगता आलं नाही ते सारं काही जगून घ्यायचं आहे. ह्यात भरडली जातात ती लहान मूलं... आणि दोष ही त्यांनाच लावला जातो आणि बोल ही. काय चुकतं हो त्यांचं? ते मोठ्यांचं अनुकरण करतात ते, की त्यांना लगेच आपण मोठं व्हावंसं वाटतं ते. मूलं मोठी होताना खूप काळजी घ्यावी लागते. मनसोक्त जगता जगता कधी मन मारून जगावं लागतं हे आपलं आपल्यालाही कळत नाही. कारण मूलं ही अनुकरणशील असतात. माझं माझ्या मुलांनी ऐकावं असं जर मला वाटत असेल तर मी माझ्या मुलांचं ऐकून घ्यायला शिकलं पाहिजे.**

आजचा पालक आणि मूल दोघेही 'ऐकून ऐकत नाहीत' अशी स्थिती आहे. दोघेही एकमेकांच्यावर स्वतःच्या इच्छा अनावधानाने / कळत - नकळत लादण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळेच द्वंद्वात अडकलेले मूल भरकटताना दिसून येते. म्हणूनच जसे बाप किती झिजतो मुलांसाठी हे कधी सांगत नाही अगदी तद्वतच मूल मनातल्या मनात का झुरते ते कधीच सांगत नाही. दोघेही मनमोकळे गप्पा मारल्याचा असा काही आव आणतात जणू एका केसाएवढही ह्यांच्या ह्रदयात काहीच मळभ राहिलेला नाही. पण जेव्हा हे आपल्या एकांताच्या विश्वात असतात तेंव्हा आतून पूर्णपणे एकटेच असतात. म्हणून मूलं मोठी होताना खूप सावध राहायला हवं. अगदी आपलं बोलणं, चालणं, व्यवहार करणं, मोबाईचा वापर, टी. व्ही. चा वापर खूप काळजी पूर्वक व्हायला हवा. पालकांनीच 24 तासातील 18 तास फोन वापरायचा, आणि मुलांना सांगायचं तुझं आयुष्य कसं घडणार सारखा मोबाईल घेऊन बसलास तर... मुलांच्या मनात प्रश्न पडतात फक्त त्यांचं लहानपण आडवं येतं नाहीतर त्यांनी लगेच सांगितलं असतं, तुम्ही का वापरता मग? त्यावर पालक म्हणून आपलं उत्तर तयार असतं, आमचं झालं आहे आता करिअर, तुझं घडण्यासाठी तू प्रयत्न कर ... सर्व पालकांना वाटतं स्पर्धा वाढली आहे, आणि या स्पर्धेत आपलं मूल टिकलं पाहिजे. त्यासाठी शाळेव्यतिरिक्त क्लास लावला जातो, पण पालकांच्याकडे वेळ नाही म्हणून क्लासला मूल स्वतः जाते व येते. त्यावेळी नकळतपणे मुलं या स्वातंत्र्याचा फायदा घेतात मग क्लास ला जायच्या आधी जवळच्या बागेत जाणं, रहदारी जास्त नाही अशा ठिकाणी जाणं,मित्र मैत्रीणींसोबत गप्पा मारत बसणं, एकमेकांची काळजी आहे असा भास तयार करून जवळीक साधण्याचा प्रयत्न करणं ... आणि खरं तर इथूनच सुरू होतो अल्लड प्रेमाचा धांगडधिंगा. त्यावेळी मुलं काय नि मुली काय आपल्या आई वडिलांचे स्टेटस काय, त्यांचे संस्कार काय याचा विचार करत नाहीत. उलट ते खोटं सांगायला, कारणे द्यायला इथून सुरुवात करत असते खरं तर. आई वडिलांचा राग येणं आणि बाहेरची व्यक्ती जवळची वाटणं, हक्काची वाटणं असा प्रवास सुरु होतो. नेमकं त्याच वेळी पालकांना वाटतं आम्ही किती वेळ या मुलांच्या मागे मागे फिरायचं, प्रत्येकवेळी तर आम्ही सोबत असणार नाही, मग स्वःहितासाठी चांगलं वाईट मुलांनाही कळायला हवं. पण एक पालक म्हणून सर्वाधिक जबाबदारी पालकांचीच आहे, कारण स्पर्धा आपणच मुलांच्या मनात तयार केली, आपण वेळ न दिल्याने मूल बाहेर आनंद शोधायला लागले, आपण मुलांनी दिलेल्या खोट्या कारणांवर विश्वास ठेवत गेलो... उदा. आज लवकर बोलावले आहे क्लासला, आज माझी सायकल सर्वात पुढे होती म्हणून मला नाही माझी सायकल काढता आली म्हणून मला उशीर झाला... पालक म्हणून आपल्यालाही हे खरं वाटतं कारण व्यवहारिक दृष्ट्या आपण गणित जुळवतो त्यामुळे हे असं होऊ शकतं हे आपल्याला पटतं. मग ऊन- सवलीसारखा खेळ सुरू होतो मुलांच्या नि पालकांच्या मनात.

पालक म्हणून आपल्याला वाटतं आम्ही किती कष्टात वाढलो, आम्हाला खायला नव्हतं, चांगले कपडे नव्हते, शाळेत 3-4 किलोमीटर चालत जावं लागायचं, नवीन पुस्तक कधी मिळालंच नाही, दुसऱ्याने वापरलेली पुस्तकं घ्यायचो अर्ध्या किंमतीत, घरात शेतात सगळीकडे काम करायचो, 2-3वर्ष नवीन कपडे कधी मिळायचे नाहीत, पण तरीही आम्ही जिद्दीने अभ्यास केला आणि आमचं करिअर घडलं... हे सगळं पालक म्हणून सतत मुलांना सांगण्याची धडपड असते आणि मुलांना ते ऐकण्याची अजिबात इच्छा नसते. इथूनच सुरू होतो एकतर्फी संवाद... आपण कसे घडलो ह्या काही गोष्टी मुलांना सांगायला आपणही छान रंगवून सकारात्मक पणे सांगत असतो पण त्यावेळी आपलं मन आपल्याला कबुली देत असतं की, तू मुलाच्या वयाचा असताना कसा होतास, काय करत होतास, किती भरकटला होतास, किती टवाळक्या केल्यास, किती आणि कसे उद्योग केले, त्यावेळी आपण ऐकलं का आई वडिलांचं ... हे सारं द्वंद्व मनात सुरू असतं पण आपण त्याचे पडसाद चेहऱ्यावर दिसू देत नाही...

कधी कधी असं



वाटून जातं आपल्यापेक्षा आपलं मूल कितीतरी पटीने चांगले आहे. पण आपण मान्य करत नाही कारण मुलांना समजले तर मुलं आपलं ऐकणार नाही या भीतीने... आणि सगळा खेळ सुरू असतो तो भीतीचाच... कारण पालकांना वाटतं समाज काय म्हणेल, नातेवाईक काय म्हणतील याची भीती... मुलांना वाटते आपण खरं सांगितलं तर ते मारतील, रागावतील, आणि पुन्हा बाहेर सोडणार नाही याची भीती...

म्हणून मुलं मोठी होताना पालक म्हणून आपली जबाबदारी जास्त आहे. आजचे चित्र फार व्यस्त आणि त्रस्त असे दिसून येते. पण मूल घडवायचे असेल तर बदल स्वतः मध्ये करावा लागेल, मूल आपोआप बदलेल. कारण मुलं अनुकरण शील असतात. ते पालकांच्या छोट्या छोट्या गोष्टींचे अनुकरण करतात आणि पालकच म्हणतात कुठून शिकून आलास रे तू...

पालकांनी कुटुंबाला, मुलांना वेळ दिला की ते बाहेरच्या गोष्टी थोड्या कमी करतील. बंद नाही होणार पण त्यांच्या मनात कायम एक गोष्ट चालू राहील की, माझे आई वडील व त्यांचे संस्कार माझ्यासाठी महत्वाचे आहेत मी बाहेर पडलो तरी भरकटण्याचा अधिकार मला नाही त्या प्रसंगी स्वतःला सावरून आई वडिलांचा स्वाभिमान जपणं ही माझी जबाबदारी आहे.

साम, दाम, दंड, भेद सर्व गोष्टी करून पाहिल्या आता स्वतः त बदल करून पाहू. चारचौघात बसल्यावर, सोशल मीडियावर माझे मूल किती चांगले व गुणी आहे हे प्रतिष्ठेसाठी खोटे सांगणे थांबवू कारण डोळ्यात आसू व चेहऱ्यावर हसू हे आभासी जगणंच बंद करूयात. काही जण आम्ही किती आनंदी, सुखी आहोत हे दाखवण्याचा खटाटोप करतात पण वास्तव अगदी भिन्न असते. अगदी त्याचप्रमाणे मुलांचे घरातील वर्तन वेगळे असते पण स्वतःच्या खोट्या समाजातील स्टेटस ला जपण्यासाठी आपण सांगतो माझे बाळ मला विचारल्या शिवाय काहीच करत नाही, नाही म्हटले तर ते पुढचे पाऊलही उचलत नाही... खरंच हे सत्य असेल आणि आपण सांगत असेल तर त्यांनी पालक म्हणून स्वतः ची जबाबदारी उत्तम पार पाडली आहे असे म्हंटले तर वावगे ठरणार नाही, मग त्यां पालकांचा उतरतीचा काळ अतिशय सुखात समाधानात जाईल यात शंका नाही कारण कुठलीच चिंता नसेल. गरजेपेक्षा अधिक चिंता सर्व दुःखाचे मूळ आहे. बऱ्याच पालकांच्या मनात असा विचार येऊन जाईल की, मग काय प्रत्येक ठिकाणी आपल्याच मुलांचे उणे सांगायचे का... झाकली मूठ सव्वा लाखाची... कारण समाज रडून ऐकतो आणि हसून सांगतो म्हणून आम्ही सगळं छान छान चित्र तयार करतो आणि तेच सांगतो. पण त्याचवेळी आपण हे सोयीस्कर रित्या विसरतो की, असे छान छान सांगितल्याने, ऐकल्याने आपल्याच मनात नकळत स्पर्धा तयार होते. उदा. मित्राचे मूल डॉक्टर झाले, मुलगी इंजिनिअर झाली हे ऐकल्यावर आपण आपल्याच नकळत आपल्या मुलांना दडपण द्यायला सुरुवात करतो, जाता येता टोमणे मारायला, मुलांना ऐकवणं करायला आपण विसरत नाही... पण त्यांचे मूल डॉक्टर होईपर्यंतचा प्रवास फक्त त्या माता पित्यालाच ठाऊक असतो तुमच्यासमोर त्यांनी तो कधी उलगडलेला नसतो, आणि आपण मात्र छान छान च ऐकून वाहवत जातो आणि घरातील वातावरण बिघडून टाकतो म्हणून आपले मूल घडवण्यासाठी आपणच बदलूयात.

# चीनमधूनच संसर्गजन्य भयानक आजार कसे जन्म घेतात ?




आधुनिक केसरी

**सन २०१९ /२०२० दरम्यान संपूर्ण जगामध्ये हाहाकार माजविणाऱ्या किरोना आजाराने थैमान घातले होते त्यामुळे संपूर्ण जग भितीच्या छायेखाली वावरत असताना अनेकांना जमिनीमध्ये गाडले जात होते एवढी भयाण परिस्थिती निर्माण झाली होती. हा आजार आटोक्यात आणण्यासाठी जगातील प्रत्येक देश प्रयत्नशील होता.**

या आजाराविषयी अनेक चर्चा,मतमतांतरे झाली. संपूर्ण जगावर अधिराज्य गाजविण्यासाठी वर्चस्वातून चीनने हा डाव मांडल्याचे बोलले जात होते पहिल्यांदाच त्यांच्याभोवतीचं संशयाची सुई फिरत होती मात्र जागतीक आरोग्य संघटना युनो, जागतीक मंच, यांनी चीनला क्लीन चिट दिली त्यामुळे चीन यामधून सहिसलामत सुटला हा आजार बरा होत असताना पुन्हा एकदा चीनमधून श्वसनविकाराच्या अनोळखी आजाराने डोके वर काढले आहे तो सुद्धा आजार संसर्गजन्य असणार आहे त्यामुळे चीनमधूनचं असले भयानक आजार कसे जन्म घेत आहेत ? चीन संसर्गजन्य आजाराचे उगमस्थान आहे काय ? असा सवाल देखिल उपस्थित होतो आहे त्यासाठी जागतीक आरोग्य संघटनेने याची चौकशी करुन जगासमोर सत्य आणले पाहिजे सद्या वातावरणामध्ये सातत्याने बद्दल होत असून जनतेने खबरदारी घेतली पाहिजे डिसेंबर जानेवारी महिन्यात हिवाळ्यात पर्यटकांची वर्दळ, शाळा महाविद्यालयांच्या सहली यासारख्या सामुहिक कार्यक्रमातून असला आजार पसरणार नाही याची संपूर्ण देशाने दक्षता घेतली पाहिजे याचं पार्श्वभुमीवर भारताच्या राजस्थान, तामिळनाडू, गुजरात, कर्नाटक, उत्तराखंड, हरियाणा या सहा राज्यांनी सतर्क राहण्याची तयारी सुरू केली आहे तसेच भारत सरकारने विदेशातून येणाऱ्या प्रवाशांची काटेकोरपणे तपासणी करणे गरजेचे आहे !

राजू जाधव, मांगूर

# पाकिस्तानच्या सीमावर्ती भागात तालिबानचे सरकार



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**भारताशी समोरासमोर युद्ध करणे शक्य नसल्याने पाकिस्तानने दहशतवादाला खतपाणी घालून भारतात अराजकता माजवण्याचा प्रयत्न केला. विशेषतः जम्मू काश्मीर मध्ये त्यांनी दहशतवाद्यांना हाताशी धरून जम्मू काश्मीर कायम अस्थिर करण्याचा प्रयत्न केला. भारताशी लढण्यासाठी ज्या दहशतवादाचा पाकिस्तानने शस्त्र म्हणून वापर केला तेच दहशतवादाचे शस्त्र आता त्यांच्यावर बुमरांग होत आहे. तालिबान ही दहशतवादी संघटना आहे हे सर्व जगाने मान्य केले आहे. ज्या वेळी तालिबानने अफगाणिस्तानवर कब्जा मिळवला त्यावेळी जगातील बहुतेक देशांनी तालिबानच्या सरकारला मान्यता देण्यास नकार दिला मात्र पाकिस्तानने तालिबानला सुरवातीपासूनच समर्थन दिले.**

अफगाणिस्तानातील तालिबानी सरकारला मान्यता देणारा पाकिस्तान हा जगातील पहिला देश होता अर्थात त्यामागे त्यांचा वेगळा डाव होता. तालिबानला मान्यता दिल्यास तालिबानला सोबत घेऊन भारतात घुसखोरी करून भारतात अस्थिरता माजवता येईल तसेच जर भविष्यात भारताविरुद्ध लढाई झाली तर त्यात तालिबानची मदत घेता येईल हा पाकिस्तानचा डाव होता. आज मात्र त्यांचा डाव त्यांच्यावरच उलटला असून तालिबानने भारताशी पंगा न घेता पाकिस्तानशीच पंगा घेत पाकिस्तानातच घुसखोरी सुरू केली. पाकिस्तान आणि अफगाणिस्तान सीमेवर आज प्रचंड तणाव निर्माण झाला असून तालिबानने पाकिस्तानी हद्दीत प्रवेश करून पाकिस्तानच्या सीमावर्ती भागातील एका जिल्ह्यात सरकार स्थापन केले आहे. याची कबुलीच खैबर पखतूनच्या राज्यपालांनी प्रसार माध्यमांशी बोलताना दिली आहे. या प्रांताचे राज्यपाल गुलाम अली यांनी सांगितले की येथील एका भागावर तालिबानने ताबा मिळवला असून पाकिस्तानातील या सीमावर्ती भागतील तालिबानी समर्थक सरकारने पाकिस्तानचे आदेश मानण्यास स्पष्ट नकार दिला आहे. या भागात आता तालिबानचे राज्य असून इथे इस्लामाबाद चे नव्हे तर काबूल चे आदेश पाळले जातील असे तेथील नवे अधिकारी राज्यपालांना सांगत आहेत याचाच अर्थ तेथे आता तालिबानने या भागावर पूर्ण कब्जा केला असून पाकिस्तानच्या हातून हा भाग निघून गेला आहे त्यामुळेच पाकिस्तानमध्ये खळबळ माजली असून दोन्ही देशातील तणाव वाढला आहे. वास्तविक अफगाणिस्तानात जेंव्हा तालिबानचे सरकार आले तेंव्हा दोन्ही देशात सौहार्दाचे वातावरण होते मात्र अल कायदाचा मोठा दहशतवादी अल जवाहिरी पाकिस्तानात मारला गेला. अमेरिकेने त्याला पाकिस्तानात घुसून मारले. या सर्व कारवाईत पाकिस्तानने अमेरिकेला मदत केली असा आरोप तालिबानने केला आणि तेथून या दोन्ही देशातील संबंध बिघडले. त्यात पाकिस्तानने पाकिस्तानात राहणाऱ्या अफगाणिस्तानी नागरिकांना देशातून हाकलण्यास सुरवात केल्याने हा तणाव आणखी वाढला आता तर हा तणाव पराकोटीचा वाढला आहे. भारताचा काश्मीर प्रांत बळकावण्यासाठी तालिबानचा वापर करता येईल असे पाकिस्तानला वाटले होते त्याच तालिबानने आता पाकिस्तानचाच भूभाग बळकावून पाकिस्तानल चांगलेच तोंडघशी पाडले आहे. भारतासाठी खणलेल्या खड्ड्यात पाकिस्तानच गाढला जाऊ लागला आहे यालाच म्हणतात जैसी करणी वैसी भरणी!



# काया ही पंढरी आत्मा हा विठ्ठल



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**महाराष्ट्राचा श्वास म्हणजे पंढरीची वारी! एका वर्षात दोन वाऱ्या आहेत. एक आषाढी आणि दुसरी आज संपन्न होणारी कार्तिकी! दोन्ही वाऱ्या ह्या दोन पेरणीच्या प्रारंभीच होतात. पंढरीची वारी म्हणजे केवळ पंढरीला जाणे आणि येणे नाही. पंढरीची वारी म्हणजे जीवनात शांती, आनंदी, निरामय, प्रसन्न विचारांची पेरणी म्हणजेच वारी! दर सहा महिन्यांनी होणारी ही वारीरूपी पेरणीच आम्हा वारकऱ्यांना वर्षभर उर्जेची पुरवणूक करते. वारकरी वर्षभर आनंदी का असतात? याचे उत्तर म्हणजे ही वारीच! वारकरी हा मूळ शेतकरीच आहे. त्याचा व्यवसाय पूर्णतः निसर्गावरच अवलंबून असल्यामुळे त्याला पंढरीच्या पांडुरंगाची साथ नेहमीच लागते. त्यासाठी तो मनोभावे दोन वेळेला पंढरीला जाऊन आपल्या शेती मातीसाठी साकडे घालून येतो.**

वारीच्या काळात शेतात होणारी पेरणी आणि वारीच्या रूपाने मानवी जीवनात होणारी भक्ती, प्रेम, आपुलकी, जिव्हाळा याची पेरणी ह्या दोन्ही पेरणी प्रतीकात्मक आहेत. एकीकडे शेतात पिकं फुलतात तर दुसरीकडे पंढरीचा वारकरी हरिभजनात दंग होऊन डुलतात! एक अलौकिक सोहळा संपूर्ण जगाला पाहायला मिळतो.

पंढरी आणि पंढरीचे वारकरी वारीकडे कसे पाहतात? ही वारी आणि आपल्या देह, दैनंदिन जगण्याचा मोठा मनोहरी संयोग जुळून आल्याचे संत एकनाथ महाराज या अभंगात लिहितात.

**काया ही पंढरी आत्मा हा विठ्ठल | नांदतो केवळ पांडुरंग ||धृ||**
**भाव-भक्ती भीमा उदक ते वाहे | बरवा शोभताहे पांडुरंग ||१||**
**दया क्षमा शांती हेचि वाळुवंट | मिळालासे थाट वैष्णवांचा ||२||**
**ज्ञान ध्यान पूजा विवेक आनंद | हाची वेणुनाद शोभतसे ||३||**
**दश इंद्रियांचा एक मेळा केला | ऐसा गोपाळकाला होत असे ||४||**
**देखिली पंढरी देही जनी वनी | एका जनार्दनी वारी करी ||५||**

माणसाचे शरीरच पंढरपूर आहे. शरीरातील आत्मा म्हणजे श्री क्षेत्र पंढरपूरचा देव श्री विठ्ठल, जो ठाई ठाई जगभर नांदतो आहे. वारकऱ्यांचा भाव आणि भक्ती रुपाने श्री क्षेत्रातील भीमा नदीच्या रूपाने वाहते आहे. याच नदीला चंद्रभागा म्हणून संबोधले जाते याचे कारण म्हणजे ती पंढरपूर क्षेत्री आली की चंद्र कोरीचा आकार घेऊन वळण घेऊन पुढे वाहते. हे सर्वच काही प्रतीकात्मक आहे. इथे भीमा नदीने चंद्राचा आकार धारण का केला? याचं कारण म्हणजे चंद्र हा जगाला शीतलता, प्रेम, वात्सल्य देणारा पृथ्वीचा उपग्रह म्हणजेच भाऊ आहे. चंद्र आकाराच्या भीमा नदीत स्नान करून पंढरीचे वारकरी आपल्या जीवनात शितलतेचा वसा घेऊन घरी परतत असतात. याच चंद्रभागेतील स्नानाने आम्ही अंतर्बाह्य शीतलता घेऊन जीवन जगत असतो. त्यामुळे लाखोचा वारकरी जनसमुदाय वर्षभर आनंदाने, गुण्यागोविंदाने नांदत असतो. याचं कारण म्हणजेच भीमा नदीचे केलेले दोनवेळा स्नान! हाच वैष्णवांचा थाट वर्षभर आपल्याला पाहायला मिळतो. वारकरी ज्या वाळवंटात नाचत नाचत भजन, कीर्तन करत, गजर करतो ते वाळवंट वारकऱ्यांना वर्षभरासाठी दया, क्षमा, शांती रुजविण्याचे हे एकमेवाद्वितीय ठिकाण आहे. याच वाळवंटात पंढरीचे वारकरी मोठ्या थाटाने एकत्र जमतात.

**पंढरीच्या लोका नाही अभिमान | पाया पडे जन एकमेका ||**

हृदयांत दया, क्षमा, शांती ओतप्रोत भरून वारकरी वाळवंटात लोटांगणे घेतात, फुगड्या



खेळतात, एकमेकांच्या पाया पडतात. हा अलौकिक सुख सोहळा जगात कुठेही पाहायला मिळणार नाही. हे पंढरीचे सुख जगात कुठेही पाहायला आणि अनुभवायला मिळणार नाही. याशिवाय पंढरपूरच्या वाळवंटात वाजणारी श्री कृष्णाची सुमधुर वेणू म्हणजे वारकऱ्याकडे असणारे ज्ञान, ध्यान, पूजा, विवेक आणि आनंद! नाथांच्या या अभंगातील हे चरण अत्यंत महत्वपूर्ण आहे. वारकरी हा केवळ टाळ कुट्या, देवदेव करणारा भोळा भाबडा माणूस नाही. तो ज्ञानी म्हणजे प्रज्ञावंत आहे. या शिवाय अष्टांग मार्गातील सर्वोच्च असणारे ध्यान तो करतो. ही दोन्ही महत्वाची साधने असून भजन, कीर्तन यानंतरच्या नवविधा भक्तीपैकी महत्वपूर्ण साधने आहेत. ज्ञान म्हणजेच प्रज्ञा माणसाला जीवनाचे खरे खरे अर्थ समजून घ्यायला भाग पाडते. ज्ञानी माणूस दैनंदिन जीवनात येणाऱ्या छोट्या मोठ्या अडचणींना सामोरे जाऊन त्यांचा मुकाबला कसा करायचा? याचे भान आणि जाण ठेवतात. ज्ञान माणसाला सर्वांगीण विचार करायला समृद्ध करते. याचा अर्थ आम्ही वारकरीच अष्टांग मार्गाचे खरे खुरे पालनकर्ते आहोत.

भारतात अनेक भक्ती संप्रदाय असले तरी हा भागवत धर्म जो वेदांच्या ज्ञानावर उभा आहे तो आम्हा सर्वांसाठी महत्वपूर्ण आहे. वेद म्हणजे आदिवासी माणसाने आनंदाने जगण्याची सांगितलेली जीवन शैली होय. त्यासाठी ज्ञानानंतर ध्यान आणि हे फलित झाल्यानंतरच पूजा करता येणे शक्य आहे. पूजा म्हणजे केवळ तासंतास घरातील देव धूत बसने म्हणजे पूजा नव्हे. भौतिक पूजा ऐवजी मानस पूजा अत्यंत महत्वपूर्ण आहे. याच्या जोडीला वारकरी आपल्या जीवनात विवेकाला महत्वपूर्ण स्थान देतो. विवेक म्हणजे योग्य-अयोग्य काय? याची जाण असणारा माणूस म्हणजे वारकरी! केवळ कर्मकांड करणारा, देवभोळा आणि बिचारा म्हणजे वारकरी नाही. या सर्वच गुणांचा परिपाक म्हणजे माणसाच्या जीवनात आनंद असणे होय. कोणताही माणूस केवळ आणि केवळ आनंदासाठी जगत असतो. ह्या सर्वच बाबी आपल्या जीवनात घेऊन वारकरी वर्षभर आणि जीवनभर जगत असतो. ही पंढरीची वारी पुढे जात जात काल्याकडे येऊन संपते. हा काला आपल्या शरीरातच विराजमान आहे. पंच कर्म इंद्रिये आणि पंच ज्ञानेंद्रिये मिळून शरीरातच ज्ञानी, निरोगी, आनंदी राहण्याचा, सकारात्मक काला आपल्या शरीरातच होत असतो. अशी आपल्या देहात, जनमानसांत आणि संपूर्ण सृष्टीत विराजमान असलेली पंढरी म्हणजेच आपले दैनंदिन जीवन जगणे होय. हीच खरी पंढरीची वारी! आज काळ बदलला असला तरीही ही पंढरीची वारी अखंडपणे सुरूच आहे. जन्मापासून ते मरण्यापर्यंतचा प्रवास म्हणजे वारीच! वारी म्हणजे पंढरी किंवा एखाद्या तीर्थाच्या ठिकाणी जाणे नाही. वारी म्हणजे माणसामध्ये सर्वांगीण परिवर्तन होणे होय! नियमित व्यायाम, योगा, प्राणायाम, ध्यान धारणा करून शरीर निरोगी-आनंदी ठेवणे म्हणजे वारी! बदलत्या काळात आज आपल्याकडे साधनांची रेलचेल असतांना दवाखान्यात जागा मिळत नाही. हे का होत आहे? याचे उत्तर म्हणजे आपण आपली बदललेली जीवन शैली! यासाठी माणसाने नित्य नित्य वारकरी असले पाहिजे. आपल्याकडे भाव, भक्ती, मानस पूजा, ज्ञान, ध्यान, विवेक, आनंद, दया, क्षमा, शांती इत्यादी गुण ओतप्रोत असणे म्हणजे खरी वारी! जाणीव, शहाणीव असणाऱ्या वारकऱ्याची जगाला गरज आहे. कालानुरूप भजन-कीर्तन-प्रवचन कार्यक्रमांची रेलचेल झाली असली तरी व्यसन कमी होत नाहीत. गरज नाही अशी पेय विकली जाणारी दुकाने दिवसेंदिवस वाढतच आहेत. माणसातील विकार जाऊन माणूस सर्वसमावेशक, वैश्विक होणे म्हणजे खरा वारकरी होणे होय! असे झाल्यास देशातील कुणीही माणूस दुःखी, रोगी असणार नाही! हेच वारीचे खरे फलित होय! जय जय रामकृष्णहरी!

# सिंदखेडराजा तालुक्यात हरबरा पिकाचे नुकसान

आधुनिक केसरी न्यूज

**सिंदखेडराजा :** तालुक्यातील शेतकरी नैसर्गिक आपत्तीमुळे आर्थिक अडचणीत सापडला असून नुकत्याच झालेल्या अवकाळी पावसामुळे हरभरा पिकावर रोगाचा प्रादुर्भाव होऊन सदर पिकाला मर लागून उभे पिक वाळले आहे.म्हणुन उभ्या हरबरा पिकात वखर घालून पुढच्या पेरणीसाठी शेतकर्यांना पर्याय शोधावा लागत आहे.त्यामुळे शेतकरी त्रस्त झाला असून आर्थिक संकटात सापडला आहे. तालुक्यातील शेतकऱ्यांनी परिसरात पाण्याचा कमी साठा असल्याने व पावसाळ्यात कमी पाऊस पडल्याने, कमी पाण्यात येणार्या हरबरा या पिकाची पेरणी मोठ्या प्रमाणात केली. हरबरा पिक ऐन बहरात असतांना नुकतीच अवकाळी पावसाने वादळी वारे व गारपिटांसह अचानक हजेरी लावली व कपाशीसह हरभऱ्याचे अतोनात नुकसान झाले आहे. आर्थिक तरतूद कशी करायची? असा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे शासनाने सदर पिकांचे त्वरित पंचनामे करून सरसकट नुकसान भरपाई देण्याची आग्रही मागणी परिसरातील शेतकरी करीत आहे.



# उपविभागीय अधिकाऱ्यांना किसान संघाचे निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** उपविभागीय अधिकारी कन्नड यांना विविध मागणीचे निवेदन देण्यात आले.दुष्काळ परिस्थिती चे पुनर्सर्वेक्षण करुन सर्व तालुक्यांचे समावेश करण्यात यावे व याची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी, शेतकऱ्यांना वीज बीर सरसकटपणे माफ करण्यात यावे,९०% अनुदानावर सौरऊर्जा शेतपंप देण्यांत यावे, विम्याची २५% टक्के रक्कम अग्रमी तात्काळ देण्यात यावी,नुकतेच अवकाळी मुसळधार पावसाने केलेल्या नुकसानचे २५०००/- रु हेक्टरी नुकसान भरपाई तातडीने देण्यात यावे, उस एफआरपी ची अंमलबजावणी व ४००/-बोनस देण्यात येत यावे,प्रमाणिक कर्जदारांना सन्मान म्हणून जाहीर केलेली रक्कम ज्या शेतकऱ्यांना अद्याप पावत मिळाली नाही त्यांना तातडीने व सन्मानाने देण्यात यावे, वन्यजीव प्राणी शेतालगत जे नुकसान करतात त्याची १००%नुकसान भारपाई द्यावी अथवा शेतकऱ्यांना वन्यजीव संदर्भात संरक्षण द्यावे किंवा मग शेतकऱ्यांना त्यांच्या पद्धतीने हत्या करण्याची परवानगी द्यावी,संगणकीकृत भुमि अभिलेख रेकॉर्ड महसूल विभागाने स्वतः अभियान राबवत संगणकीय रेकॉर्ड शासनाने द्यावे आदि विविध मागण्यांचे निवेदन भारतीय किसान संघाच्या माध्यमातून उपविभागीय अधिकारी यांना देण्यात आले.यावेळी पदाधिकारी उपस्थित होते.



# फुलंब्री येथे श्री संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज यांची जयंती साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** शहरांमध्ये श्री.संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज यांची 399 वी जयंती तेली समाज सभागृहात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी सर्वप्रथम संत जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेचे भाजपचे जिल्हाध्यक्ष सुहासभाऊ शिरसाठ, तेली समाज संघटनेचे शहराध्यक्ष सुरेश मिसाळ, युवकचे शहराध्यक्ष अक्षय पाडळकर, भाजप शहराध्यक्ष योगेश मिसाळ, अंबादास तावडे, संतोष दुतोंडे, संतोष मिसाळ, उत्तम आढाव यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी संत जगनाडे महाराज यांच्या ३९९ व्या जयंती निमित्त राधा मिसाळ, शोता मिसाळ यांनी संताजी जगनाडे महाराज यांची प्रतिमा रांगोळीच्या माध्यमातून तेली समाज सभागृहात रेखाटली. त्यामुळे सुहास शिरसाठ व योगेश मिसाळ यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी मधुकर दुतोंडे, रमेश राऊत, संतोष मिसाळ, कांता आढाव, सोमीनाथ दुतोंडे, जगन तावडे, प्रमोद मिसाळ, अशोक राऊत, गंगाधर तावडे, प्रकाश लोखंडे, बाळू तावडे, रमेश तावडे, भाऊसाहेब आढाव, राजू वाळके,गणेश मिसाळ, रमेश मिसाळ, गणेश तावडे, काशिनाथ दुतोंडे, विलास वाडेकर, रवी आढाव, संभाजी शिंदे, सतिश मिसाळ, सुरेश गायकवाड, कृष्णा तावडे, रामेश्वर तावडे, मनोज मिसाळ, विकास मिसाळ, अमोल राऊत, राजू मिसाळ, शिवाजी दुतोंडे, योगेश खैरे, योगेश पेंढारे, बाळू आढाव, विष्णू राऊत, मनोज दुतोंडे, गजानन तावडे, रामदास आढाव, पंकज लोखंडे, नागेश मिसाळ, वैभव दुतोंडे , कृष्णा दुतोंडे ,अमोल आढाव, सागर माठे, अमोल मिसाळ, रत्नाकर आढाव, आकाश दुतोंडे , सचिन आढाव, उमेश मिसाळ, सार्थक मिसाळ, ज्ञानेश्वर तावडे, सतीश मिसाळ, मनोज राऊत, मुरलीधर राऊत, गोपाळ पंडित, ज्ञानेश्वर दुतोंडे, दिनेश मिसाळ, अक्षय आढाव, नितीन मिसाळ, ओम मिसाळ यांच्यासह आदी समाज बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थित होती..!



# ज्ञानाच्या अथांग महासागरास त्रिवार अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** विनोद कसारे मित्र परिवार यांच्या वतीने महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव, प. पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 67 व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून सामूहिक बुद्ध वंदना घेऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी फुलंब्री पोलिस स्टेशन चे उपनिरीक्षक साहेब श्रीनिवास धुळे सर आदि पदाधिकारी कार्यकर्ते यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# केपीसीएलने करारावर त्वरीत अंमल करावा

## हंसराज अहीर : वेकोलिने केंद्रीय नितीनुसार कार्यवाही करावी

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** वेकोलि बल्लारपूर क्षेत्रातील सास्ती व धोपटाळा तसेच चंद्रपूर क्षेत्रातील भटाळी खाणीशी संबंधित ओबीसी व अन्य प्रकल्पग्रस्तांचे अनेक प्रश्न वेकोलि प्रबंधनाच्या चुकीमुळे प्रलंबित असल्यामुळे या प्रकल्पग्रस्तांची नाहक ससेहोलपट सुरु आहे. जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश असतांनाही वेकोलि अधिकारी या आदेशांचे उल्लंघन करीत असल्याने जिल्हाधिकाऱ्यांनी या प्रकरणात गांभीर्याने लक्ष घालुन वेकोलिच्या या प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न तातडीने मार्गी लावण्याची प्रशासकीय स्तरावरुन कार्यवाही करावी आणि वेकोलिने केंद्रीय नितीनुसार तसेच केपीसीएलने महाराष्ट्र सरकारच्या करारावर त्वरीत अंमल करावा असे निर्देश राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांनी दिले.

स्थानिक शासकीय विश्रामगृहात दि. 07 डिसेंबर, 2023 रोजी सास्ती, धोपटाळा व भटाळी माईन्सशी संबंधित प्रकल्पग्रस्तांच्या



प्रश्नांवर जिल्हाधिकारी यांचेशी चर्चा करताना अहीर यांनी निर्देश दिले की, जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून जे सर्व्हेक्षण व प्रकल्पग्रस्तांची ही यादी वेकोलि प्रबंधनास सादर केली व अवार्ड मध्ये जी नावे नमुद आहेत. ती ग्राह्य धरुन वेकोलिने सर्वांना मोबदला व नोकऱ्या दिल्या पाहिजे. जिथे ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी कमी आहेत तिथे तुकडेबंदीचा आधार घेवून वेकोलि नोकऱ्या व मोबदला देण्यासाठी टाळाटाळ करीत होती हे चुकीचे असून नुकतेच माननिय उच्च न्यायालयाने आदेश पारित करुन वेकोलिला या संबंधात महसुल अधिकाऱ्यांचे म्हणणे ऐकतानांच एसडीओ व तहसिलदार यांचे आदेश ग्राह्य मानत कार्यवाही करण्याचे निर्देश वेकोलिला असतांना त्यावर अंमलबजावणी होत नसल्याने जिल्हा प्रशासनाने यात लक्ष घालुन पिडीत प्रकल्पग्रस्तांना न्याय देण्याकरीता कार्यवाही करावी अशा सुचनाही जिल्हाधिकाऱ्यांना केल्या. यावेळी एनसीबीसी अध्यक्षांनी एम्टाशी संबंधित प्रलंबित विषयांवर सुध्दा चर्चा केली साडे पाच महिन्यांपुर्वी आयोगाने सुनावणी घेतली होती. त्यानुसार सुचिबध्द कामास सुरुवात झाली असून काही याद्या तयार झाल्या आहेत. अनेक बाबींवर कार्यवाही झाली असून काही कामे प्रलंबित आहेत काही कामगारांना नोकरी देवून वेतन दिले जात आहे परंतु अजुनही अनेक बाबी प्रलंबित असल्याची माहिती या चर्चेदरम्यान जिल्हाधिकाऱ्यांना अवगत करण्यात आले. याविषयी झालेल्या सुनावणीचा आढावा घेवून कार्यवाहीकरीता प्रशासनाने तत्पर रहावे अशी सुचना केली. यावेळी वरोराचे उपविभागीय अधिकारी, जिल्हा पुनर्वसन अधिकारी, भाजपा किसान मोर्चा चे जिल्हाध्यक्ष राजु घरोटे यांची उपस्थिती होती. शेतकऱ्यांचे प्रलंबित प्रश्न, पुनर्वसन विषयक बाबींवर येत्या 22 डिसेंबर, 2023 रोजी नवी दिल्ली येथे आयोगाव्दार केपीसीएल (एम्टा) प्रश्नी कर्नाटक सरकारचे मुख्य सचिव, उर्जा मंत्रालयाचे सचिव यांची बैठक घेण्यात येणार असून या बैठकीमध्ये सकारात्मक निर्णय होण्याची शक्यता एनसीबीसी अध्यक्ष हंसराज अहीर यांनी व्यक्त केली.

# तहसील कार्यालयातून वाळुचा ट्रॅक्टर पळविला

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** येथील तहसील कार्यालयातून महसुल विभागाने अवैध वाळूचा जप्त केलेला ट्रक्टर व ट्रॉली मालकासह साथीदारांनी रात्रीचा चोरून नेल्याची गुप्त माहिती पोलिसांनी मिळाली त्या वरुन खुलताबाद पोलिसांनी त्या दोघांना अटक करून न्यायालयात उभे केले असता दोनदिवसीय पोलिस कोठडी सुनावली. सुलतानपूर गाव शिवारात अवैधरीत्या वाळु उत्खनन करून वाहतूक करत असल्याचे विनानंबरचा ट्रक्टर व ट्रॉली सजाच्य तलाठ्याने पकडून तहसील कार्यालयात लावण्यात आला होता.त्यात उपविभागीय अधिकारी यांनी त्या अवैध वाळु व वाहतूक बघता ट्रक्टर ट्राली साठी १लाख ३२हजार रुपयेचे आर्थिक दंड आकारला होता. मात्र दि.२रोजी मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी ट्रक्टर ट्राली परस्पर लांबवली.या प्रकरणी मा तहसीलदार स्वरुप कंकाळ यांच्या आदेशानुसार महसुल साहाय्यक विनेश महेर यांनी खुलताबाद पोलिस ठाण्यात लेखी तक्रार दिली. त्यावरुन पोलिस निरीक्षक भुजंग हातमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हेडकॉन्सटेबल शेख जाकीर व के जी गवळी यांनी गोपनिय बातमीदार कडून माहिती च्या आधारे जप्त केलेले ट्रक्टर ट्राली धारक मालक रमेश ज्ञानेश्वर चव्हाण रा सुलतानपूर व त्याचा साथीदार गणेश रामदास गायकवाड रा.बाजारसावंगी ता खुलताबाद यांनीच विनानंबरचा ट्रक्टर ट्राली परस्पर चोरुन नेल्याचे तपासात निष्पन्न झाले.

# बाबरी मस्जिद पाडणाऱ्यांवर कठोर कारवाईची मुस्लीम बांधवांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** बाबरी मस्जिद पाडणाऱ्यावर कठोर कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी येथील मूस्लीम बांधवाकडुन बूधवारी ता (सहा) करण्यात आली आहे. उत्तरप्रदेश राज्यातील अयोध्या येथे भारताचा पहिला मुघल सम्राट बाबर याच्या नावाने १५२८ मध्ये मुघल सैन्यातील सेनापती मीर बाकी यांने एक मस्जिद बांधली होती. ती मस्जिद १६ व्या शतकातील ऐतिहासिक मस्जिद होती, काही हिंदूवादी कार्यकर्त्यांनी सदरील मस्जिद हि रामजन्मभूमीच्या जागेवर बांधली गेली असे म्हणून त्याजागेवर मंदिर बांधण्याची मागणी केल्याने सदरिल मस्जिद हिंदू आणि मुस्लिमांमधील वादाचे कारण होती. आणि १९९२ मध्ये हिंदू जमावाने तिची नासधूस केल्याने संपूर्ण भारतभर व्यापक हिंसाचार सुरू झाला होता. बाबरी मशिदीच्या विध्वंसामुळे दोन दशकांहून अधिक काळ सर्वोच्च न्यायालयात



खटला चालला. २०१९ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने बाबरी मशीद ज्या जमिनीवर उभी होती ती हिंदू ट्रस्टला मंदिर बांधण्यासाठी द्यावी असा निर्णय दिला होता. निर्णय देत असताना सदरील मस्जिद पाडणे हि घटना चुकीची होती असे न्यायालयाने म्हटले होते समस्त मुस्लिम बांधवांच्या वतीने मस्जिद पाण्याच्या घटनेमध्ये असलेल्या सर्व दोषीवर कठोर शिक्षा करा अशी मागणी बूधवारी निवेदनाव्दारे राष्ट्रपतीकडे उपविभागीय अधिकारी कार्यालय भोकर यांच्यामार्फत करण्यात आली. निवेदनावर मौलाना मुबीनखॉन इनामदार जिल्हाउपाध्यक्ष जमियते उलैमा ए हिंद,हाफिज सद्दाम भोकर तालुका अध्यक्ष याची स्वाक्षरी आहे. यावेळी सय्यद जुनेद , हाफिज कामरान, हाफिज आदिल ,मौलाना मुजीब,हाफिज मस्लोदीन, सय्यद अलमास ,जुनेद पटेल ,शेख मुबशशीर, हाफिज निजाम ,इलियास सर ,रेहान सर ,अकबर अहमद ,मिर्झा अज़हर यांची उपस्थिती होती.

# रेल्वेच्या विरोधात गाजर दाखवा आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** जनतेसाठी सर्वात स्वस्त व सुरक्षेचा सर्वात चांगला प्रवास म्हणून रेल्वे सेवेकडे पाहिले जाते.मुंबईच्या बाजूला असून सुद्धा उरण तालुक्यात आजपर्यंत रेल्वे धावली



नाही. उरण मधील जनता रेल्वे सेवेपासून वर्षानुवर्षे वंचित राहिली आहे. मात्र गेल्या वर्षीपासून रेल्वेचे काम प्रगती पथावर आहे. ६ महिन्यापूर्वी उरण ते खारकोपर रेल्वेचे डेमो सुद्धा झाले. ६ महिन्यापूर्वी उरण ते खारकोपर रेल्वे धावली. व रेल्वेची चाचपणी सुद्धा झाली. मात्र ६ महिने उलटूनही अद्यापही उरण ते खारकोपर रेल्वे सेवा सुरु झाली नाही. संपूर्ण उरण तालुक्यात कुठेही रेल्वे सेवा सुरु झाली नाही. रेल्वेचे प्रशासनातर्फे रेल्वे सुरु होणार असल्याच्या तारखा वारंवार बदलण्यात येत आहेत. वर्षभरात अनेकदा रेल्वे सेवा सुरू होणार अशा बातम्याही वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या. त्यामुळे उरणची जनता रेल्वे सेवा सुरु होणार म्हणून आनंदात होते. मात्र रेल्वे प्रशासन रेल्वे सुरु होण्याच्या तारखा वारंवार बदलत असल्याने उरणच्या नागरिकांत या गोष्टी विषयी असंतोष निर्माण झाले आहे.रेल्वेचे सर्व काम ६ महिन्यापूर्वीच पूर्ण झाले आहे तरी अद्यापही रेल्वे सेवा उरण मध्ये सुरु होत नसल्याने जनतेमध्ये प्रचंड चीड निर्माण झाली आहे. रेल्वे प्रशासन वारंवार तारखा बदलत असल्याने व जनतेच्या समस्यांचा, भावनांचा विचार होत नसल्याने उरण तालुका व उरण शहर काँग्रेसने याबाबत आक्रमक भूमिका घेत काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांच्या मार्गदर्शनाखाली रेल्वे प्रशासनाच्या ढिसाळ कारभाराचा निषेध करण्यासाठी गुरवार दि ७ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी ११:३० वाजता उरण रेल्वे स्टेशनच्या मेन गेट समोर जाऊन गाजर दाखवा आंदोलन करण्यात आले.यावेळी काँग्रेसच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्र शासनाचा गाजर दाखवून निषेध केला.यावेळी महाराष्ट्र प्रदेश अल्पसंख्यांक सरचिटणीस रेमंड लोवीयस,काँग्रेसचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष किरीट पाटील, राष्ट्र सेवा दल रायगड जिल्हा कार्याध्यक्ष वैभव ठाकूर,तालुकाध्यक्ष विनोद म्हात्रे, महिला तालुकाध्यक्ष रेखा घरत, माजी नगरसेवक बबन कांबळे,शहराध्यक्ष प्रकाश पाटील,शहराध्यक्ष अफशा मुकरी,देविदास थळी आदींनी आपले मनोगत व्यक्त करून रेल्वे सुरु होत नसल्याबाबत केंद्र व राज्य शासनाचा निषेध केला.

# विविध मागण्यांसाठी भोकरला अंगणवाडी कर्मचाऱ्यांची निदर्शने

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** येथील अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी सिटू च्या वतीने विविध मागण्यासाठी घोषणा बाजी करून शुक्रवारी ता. (आठ) तहसील कार्यालया समोर निदर्शने केली आहेत . मागील चार दिवसांपासूनपासून राज्यात अंगणवाडी कर्मचाऱ्यांचा बेमुद्दत संप सुरू असून दोन लाख कर्मचारी या संपात सहभागी झाले आहेत. तालुक्यातील अंगणवाडी कर्मचारी संपात सहभागी झाले आहेत.शूक्रवारी तहसील कार्यालया समोर निदर्शने करून मांगण्याचे निवेदन देण्यात आले. निवेदनात नमूद केले आहे की, मानधनात वाढ केलेली नाही. आहाराच्या व इंधनाच्या दरात वाढ दिलेली नाही. ऑनलाईन कामासाठी मोबाईल व चांगला ॲप दिलेला नाही. अंगणवाडी कर्मचाऱ्यांना




शासकीय सेवेत सामावून घ्यावे. सेवकांना किमान वेतन देऊन ग्रॅच्युईटी लागू करा. लाभार्थ्यांना गरम, ताजा आहार द्यावा अशी मागणी करण्यात आली आहे. आंदोलनाचे नेतृत्व जिल्हाअध्यक्षा शिवाजी गायकवाड , जिल्हा सचिव दिलीप पोतरे , शिवाजी वारले, विनोद गायकवाड यांनी केले. तर पत्रकार बी. आर.पाञ्चाळ यांनी मार्गदर्शन केले आहे. मांगन्याच्या निवेदनावर वनिता पांचाळ, तक्षशिला गायकवाड, कलावती शिंदे, मिरा चव्हाण, अनुसया कंदेवाड, बेबीताई डवरे, रेखा किसवे, अहेमदबी पठाण, वनिता तेले, ललीता ताटे, राजश्री चालीकवार, माया जाधव, किरण विजापूरे, आदिनी स्वाक्षरी करूण सहभाग नोंदविला.



# विद्यार्थ्यांनी घेतलेल्या मेहनतीचे हे यश : शुभांगी धसाडे

## स्टेअर्स फाउंडेशनच्या स्पर्धेतून विद्यार्थी चमकले

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** स्टेअर्स फाउंडेशन कडून घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत सातारा जिल्ह्यातील खेळाडू सहभागी होते.या स्पर्धेत विविध खेळातून विद्यार्थ्यांनी यश मिळविणारी कामगिरी केलेली असून विद्यार्थ्यांनी घेतलेल्या मेहनतीचे हे यश आहे, असे प्रतिपादन स्टेअर्स फाउंडेशनच्या सातारा जिल्हा निरीक्षक शुभांगी धसाडे यांनी केले.सातारा जिल्ह्यातील खेळाडूंनी मिळविलेल्या या घवघवीत यशाबद्दल शुभांगी धसाडे यांनी विशेष अभिनंदन केलेले आहे.स्टेअर्स फाउंडेशनच्या माध्यमातून अनेक खेळाडुंना आपले कौशल्य दाखविण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आलेली असून खेळाडू या संधीचे सोने करू लागलेले आहेत.

युवा कार्यक्रम आणि खेळ मंत्रालय भारत सरकार तसेच नॅशनल स्पोर्ट्स प्रमोशन ऑर्गनायझेशन मान्यताप्राप्त स्टेअर्स फाउंडेशन कडून सोलापूर येथे दि.१ ते ३ डिसेंबर रोजी राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेतून सातारा जिल्ह्यातील अनेक विद्यार्थ्यांनी यश मिळविलेले असून या यशाबद्दल स्टेअर फाउंडेशनच्या सातारा जिल्हा निरीक्षक शुभांगी धसाडे यांनी सर्वांचेच कौतुक करीत अभिनंदन केलेले आहे. विद्यार्थ्यांनी घेतलेल्या मेहनतीचे हे यश असल्याचे सुद्धा शुभांगी धासाडे यांनी म्हटलेले आहे. राज्यभरातून आलेले अनेक विद्यार्थी खेळाडू या राज्यस्तरिय स्पर्धेतून स्वतःची चमकदार कामगिरी दाखवत होते.सिंहगड इन्स्टिट्यूट केगाव,सोलापूर या ठिकाणी तीन दिवस चाललेल्या या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेच्या उदघाटन प्रसंगी स्टेअर्स फाउंडेशनचे महाराष्ट्र अध्यक्ष बालाजी जोगदंड, महाराष्ट्र महासचिव सुनिल शिंदे व इतर मान्यवर उपस्थित होते. प्रमूख मान्यवरांच्या हस्ते हा स्पर्धेचा शुभारंभ करण्यात आला. राज्यातून आलेल्या अनेक खेळाडूंनी चांगले यश मिळवले. सातारा जिल्ह्यातून आलेल्या विविध शाळेतील सहभागी असलेल्या विद्यार्थ्यांनी घवघवीत असे यश



मिळविले.क्रिकेट संघ १२ गोल्ड मेडल,खो-खो संघ १२ गोल्ड मेडल,

ॲथलेटिक्स मध्ये १७ गोल्ड,सिल्वर ९,ब्राँझ १२ असे भरीव स्वरूपाचे यश मिळवून क्रिडा स्पर्धेत सातारा जिल्हयातील खेळाडूनी विविध खेळांमध्ये एक चांगली कामगिरी केली आहे. स्पर्धा सुरू होण्यापूर्वी बालाजी जोगदंड यांनी खेळाडूंना मार्गदर्शन करत असताना भारत सरकारच्या क्रीडा मंत्रालयाची मान्यता असलेल्या स्टेअर्स फाऊंडेशन तर्फे महाराष्ट्र राज्यातील मुला-मुलींना प्रोत्साहन पर शुभेच्छा दिल्या.राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेमध्ये विजयी खेळाडूंना राष्ट्रीय स्तरावर तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील व्यासपीठ उपलब्ध करण्यात येते आहे. राज्यस्तरीय व राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील निवडक विजय खेळाडू यांनाआगामी काळात स्कूल गेम्स खेलो इंडिया अंतर विद्यापीठ स्पर्धा तसेच भारतीय क्रीडा प्राधिकरण साई इत्यादी विविध मान्यताप्राप्त व्यासपीठ उपलब्ध होणार आहेत.असे सुद्धा त्यांनी म्हटले. महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातून आलेल्या विद्यार्थ्यांचा विविध खेळांमध्ये सहभाग लाभला त्यामध्ये विजेत्या प्रत्येक खेळाडूला त्याच्या आलेल्या क्रमांका नुसार गोल्ड, सिल्वर आणि ब्राँन्झ मेडल देऊन गौरवण्यात आले कार्यक्रमाचे आयोजन नागेश शेट्टीकर यांनी केले तसेच आभार प्रदर्शन स्टेअर्स फाउंडेशनच्या सातारा जिल्हा निरीक्षक शुंभागी धसाडे यांनी केले.स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी अनिल शेळके,दत्तात्रय भोईटे आणि सारिका वायदंडे यांच्या सह अनेकांनी मोलाचे सहकार्य केले.सातारा जिल्ह्यातील खेळाडुंना स्टेअर्स फाउंडेशनच्या माध्यमातून खेळण्याची संधी मिळत असल्याने स्टेअर्स फाउंडेशन सह सातारा जिल्ह्याच्या निरीक्षक शुभांगी धसाडे यांचे सुद्धा विशेष कौतुक केले जात आहे.



# संविधानदिनी मुलांच्या वसतीगृहात वृक्षारोपण

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** औद्योगिक प्रशिक्षण संस्था मुलांचे वसतीगृह छत्रपती संभाजीनगर येथे संविधान दिनी उद्देशिकीचे वाचन करून विद्यार्थ्यांना संविधानाच्या प्रती वाटप करण्यात आल्या. संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

औद्योगिक प्रशिक्षण संस्था मुलांच्या वसतीगृहात पिंपळ, लिंब, वड अशा विविध झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमाचे उदघाटक भिमराव मेश्राम (माजी सहसंचालक भूजल सर्वेक्षण विभाग), कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे महेंद्र मंगलगे (सेवाभावी निवृत्त कर्मचारी संघटना सचिव), कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.विलास जोंधळे, योगा प्रशिक्षक रमेश जाधव, विजतंत्री निदेशक पांचाळ सर उपस्थित होते.महापुरुषाच्या प्रतिमाचे दीपप्रज्वलन करून कार्यक्रमास सुरुवात झाली. प्रमुख वक्त्यांनी विद्यार्थ्यांना मौलिक मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पवन राजपूत यांनी केले तर आभार आनंद नलावडेनी मानले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी मयूर सिर भय्या, आदर्श भोयर, सतिष ताठे, चंद्रशेखर दुधे, किरण भुतेकर, हनुमान भुतेकर, रंजित गायकवाड आदींनी परिश्रम घेतले.

# ग्लोरी स्कूलमध्ये बाबासाहेबांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** ७६ व्या महापरिनिर्वाण दिनी शिरवळ ता.खंडाळा येथील ग्लोरी इंग्लिश मिडीयममध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करणाऱ्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्याअध्यक्षस्थानी ग्लोरी इंग्लिश मिडीयम स्कूलचे मुख्याध्यापक जितेंद्र भणगे होते.तर प्रमुख पाहुणे म्हणून राहुल गंगावणे हे उपस्थित होते. यावेळी त्यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या प्रसंगी विचार पिठावर शाळेच्या उपमुख्याध्यापिका वैशाली भणगे उपस्थित होत्या. विद्यार्थ्यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याविषयी संपूर्ण माहिती सांगत असताना राहुल गंगावणे यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार सर्व विद्यार्थ्यांनी जीवनात अवलंबवावे असे आपल्या अध्यक्षीय भाषणातून शाळेचे मुख्याध्यापक जितेंद्र भणगे यांनी सांगितले. तसेच शाळेच्या शिक्षिका विद्या भारती, वोमिका चौधरी यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी महत्वपूर्ण माहिती विद्यार्थ्यांना सांगितली. त्याचबरोबर कुमार अर्णव, स्वप्निल गायकवाड, अंश मालुसरे, विशाखा गंगावणे, शर्वरी सरवदे, सोहम पिसाळ, वैशू कुंभार, रुद्र कडाळे आदी विद्यार्थ्यांनी मनोगते व्यक्त केली. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शीतल भणगे, वर्षा शिंदे,दिपाली पवार, दिपाली कुंभार, वैशाली खोपडे, जया देमडे, सोनल बर्गे, सोनाली बोराटे, ज्योती लोखंडे, अर्चना गायकवाड, नूतन जाधव, किरण खोपडे यांनी खूप परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सविता कांबळे यांनी केले तर आभार प्रदर्शन हेमा दीक्षित यांनी मानले. भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



# नगरसूल शिवारात दोन दरोडेखोर ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** येवला तालुक्यातील नगरसूल शिवारातील नांदगाव रस्त्यावरील मुळूबाई घाटात दरोडा टाकण्याच्या प्रयत्नात असलेल्या टोळीपैकी दोन संशयितांना येवला तालुका पोलिसांनी ताब्यात घेतले. पोलिसांनी या कारवाईत २० लाखांहून अधिकचा मुद्देमाल ताब्यात घेतला आहे. येवला-नांदगाव रस्त्यावरील मुळूबाई घाटावर तालुका पोलिसांच्या पथकाला काही लोक संशयास्पदरित्या फिरतांना आढळले. पथकाने रामा पवार (४०, रा. तेरखेडा पारधी वस्ती), शंकर पवार (२३, रा. खामकरवाडी), नितीन पवार (रा. लक्ष्मीपेडी पारधी वस्ती) आणि अन्य संशयितांना ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. यातील रामा आणि शंकर हे पोलिसांच्या हाती लागले. अन्य दोन संशयित पळून गेले. त्यांच्याकडे दरोड्याचे साहित्य, दरोड्यासाठी वापरण्यात येणारे वाहन असा २० लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. येवला तालुका पोलीस ठाण्यात या संदर्भात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# महामार्गावरील चुकीच्या ठिकाणी बनवलेले अंडरपास बदलण्यात यावे : मनसेचे निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**इगतपुरी :** मुंबई आग्रा महामार्गावरील चौफुलीवर अनेक ठिकाणी चुकीचे अंडरपास निर्माण केल्याने अनेक अपघात होत आहे. शासनाने त्वरीत याची दखल घ्यावी या मागणीसाठी मनसेचे तालुकाध्यक्ष रामदास आडोळे, जिल्हाध्यक्ष भगिरथ मराडे, उपाध्यक्ष भोलेनाथ चव्हाण यांनी तहसीदार यांना निवेदन दिले. या निवेदनात म्हटले आहे की, मुंबई आग्रा राष्ट्रीय महामार्ग हा इगतपुरी तालुक्यातून गेला असुन इगतपुरी तालुक्यातील वाडीवऱ्हे फाटा ते पिंप्री फाटा पर्यंत हा राष्ट्रीय महामार्ग गेलेला आहे. या महामार्गाचे चौपदरिकरण झाल्यानंतर राष्ट्रीय महामार्गा प्राधिकरण यांच्याकडून वाडीव-हे, पाडळी फाटा, मुंढेगाव, खंबाळे टाकेघोटी, बोरटेंभे, घोटी बु. आदी ठिकाणी अंडरपास तयार केलेले आहेत. तसेच हे अंडरपास चुकीच्या ठिकाणी निर्माण केल्याने परीणामी या अंडरपासचा वापर होत नसल्याने परीसरातील नागरीकांना नाईलाजस्तव महामार्गावरून जिवघेणा प्रवास करावा लागत आहे. यामुळे अनेक जनांचा नाहक बळी गेला असुन अनेकांना कायमचे अंपगत्व आले आहे. तसेच हे अपघात टाळण्यासाठी योग्य वर्दळीच्या ठिकाणी अंडरपासची निर्मीती करावी अथवा वरील ठिकाणी पुलाची निर्मीती करण्यात यावी. तसेच वाडीव-हे ते पिंप्री दरम्यान असलेल्या रस्त्यावर ठिकठिकाणी साईट पट्टी, दिशा दर्शक फलक नसल्याने व साईट पट्ट्यांच्या जागेत खड्डे झालेले आहेत. त्यामुळेही अनेक अपघात होत आहेत. अपघातांचे हे प्रमाण रोखण्यासाठी या रस्त्यावर आवश्यक त्या ठिकाणी दिशा दर्शक फलक लावले जावे, दिशा दर्शक पट्या निर्माण करावे, खराब झालेले स्पीड ब्रेकर दुरुस्त करण्यात यावे. साईट पट्या व त्यात तयार झालेले खड्डे दुरुस्त करण्यात यावे. या मागणीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने इगतपुरीचे नायब तहसीलदार विजय भंडारी यांना निवेदन देऊन चर्चा करण्यात आली. वेळीच या मागण्याची दखल न घेतल्यास महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने येत्या प्रजासत्ताक दिनी तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला असून याची सर्व जबाबदारी प्रशासनावर राहील असे निवेदनात म्हटले आहे. यावेळी मनसेचे तालुकाध्यक्ष रामदास आडोळे, जिल्हाध्यक्ष भगिरथ मराडे, उपाध्यक्ष भोलेनाथ चव्हाण, मनसे वाहतुक सेना तालुकाध्यक्ष कृष्णा भगत, पंढरीनाथ नव्हाटे, मनोहर खातळे, संजय गुप्ता, पोपट दोंदे, मनोज भगत, गोविंद कडु, चिमा दोरे, चंदर मधे, ज्ञानेश्वर पोकळे, सोमा दोरे, भास्कर कोरडे, अनिल वारुंगसे, दशरथ गांगुर्डे, शिवाजी जाधव, पिंटु कर्पे, नाथाभाऊ गांगुर्डे, मनोज बांबळे, लक्ष्मण आडोळे, बाळु दालभगत, बजरंग भटाटे, योगेश गायकवाड आदी उपस्थित होते.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर

9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद

उपलब्ध सुविधा

- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे



पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# पर्यावरणप्रेमी आणि पारंपारिक मच्छिमार आक्रमक

आधुनिक केसरी न्यूज

**परमेश्वर घुंगासे**

**पैठण :** जायकवाडी जलाशयावरील प्रस्तावित सौरउर्जा प्रकल्प तातडीने रद्द करण्यात यावा. केंद्रशासनाच्या अधीन असलेल्या NTPC लि. कंपनीला दिलेल्या कामाचे प्रस्ताव रद्द करण्यात यावा. या प्रमुख मागणीसाठी पैठण शहरात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या समोर गुरुवार दि, 7 रोजी 75 कहार, मच्छीमार आदी बांधव सामुहिक अमरण उपोषणाला बसले असुन त्याना पांठीबा देण्यासाठी शहरातील कहार समाजीनी आपले व्यवसाय बंद ठेवत हजारो कहार समाजातील महीला पुरुषानी पाठिंबा देत सरकारच्या विरोधात घोषणाबाजी करुन निषेध व्यक्त करत आहेत. सौरऊर्जा पॅनलमुळे काही वाईट परिणाम होतील. सौर पॅनलमुळे सूर्याची किरणे पाण्याखाली जाणार नसून पाण्यातील जीव आणि पक्ष्यांची अंडी घालण्याचे ठिकाण यामुळे संपुष्ठात येईल. अन्न नसल्याने स्थलांतरित पक्षी येणार तर नाहीतच शिवाय येथील पक्ष्यांच्या अधिवासाची जागा घटून धरणातील जैवविविधता संपुष्ट होईल.

सोलर पैनलमुळे ओक्सिजनच्या अभावामुळे पाण्यातील वनस्पती, शेवाळ, आणि इतर घटक जे जलचरांसाठी आवश्यक आहे, त्यावर परिणाम होणार आहे. जैवविविधतेवर आणि जलचर प्राण्यांवर विध्वंसक परिणाम होणार असल्याचा दावा पर्यावरण प्रेमी आणि पक्षी प्रेमी यांनी शासनाकडे निवेदनाद्वारे केला आहे.. शासन या होत असलेल्या विरोधाकडे पाहत काय निर्णय घेते या कडे सर्वांचे लक्ष लागून आहे!



# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६७ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** केशवस्मृती प्रतिष्ठान संचलित समतोल प्रकल्प बाल सहायता केंद्रा तर्फे दि ६ डिसेंबर २०२३ रोजी महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६७ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. संध्याकाळी ०४:०० वाजता जळगाव आर. पी. एफ चे एन. जी. राणे साहेब यांच्या हस्ते जळगाव रेल्वे स्टेशन येथील समतोल प्रकल्प बाल सहायता केंद्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रस्तुत कार्यक्रमासाठी लोहमार्ग पोलीस स्टेशनचे ठाणे अमलदार हिरालाल चौधरी रेल्वे आर.पी.एफ.चे प्रधान आरक्षक मिलिंद तायडे सर प्रधान आरक्षक पंकज वाघ सर व समतोल प्रकल्पाचे श्री. प्रदिप पाटील, रविना भगत उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. समतोल प्रकल्पाचे व्यवस्थापक श्री. प्रदिप पाटील यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषय माहिती देत , त्यांनी केलेल्या महान अशा कार्याचे महत्व सांगितले . यानंतर सर्व उपस्थितांचे आभार मानून मान्यवरांच्या परवानगीने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



# भारती विद्यापीठ गणित परीक्षेत आरकेएम विद्यालयाची आर्या सोनवणे राज्यात प्रथम

आधुनिक केसरी न्यूज



**कळवण :** कळवण येथील आर के एम विद्यालयातील विद्यार्थिनी कुमारी आर्या सुरेश सोनवणे हीने भारती विद्यापीठ परीक्षा पुणे गणित पूर्व प्रथमा परीक्षेत राज्यात प्रथम क्रमांक मिळविला आहे. ती प्राध्यापक सुरेश सोनवणे यांची कन्या आहे आर्या सोनवणे हिला लीना पाटील मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले.

आर्याच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ रावसाहेब शिंदे, उपाध्यक्ष हर्षवर्धन पवार, सरचिटणीस भूषणदादा पगार, संचालक मंडळ, प्राचार्य जी. डी. रौंदळ, उपप्राचार्य एस. पी. बागुल, उपमुख्याध्यापक, जे. आर. जाधव, पर्यवेक्षक पी. एम. महाडिक, डी. जे. पवार, व सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

# रेल्वे उड्डाणपूल दुरुस्तीसाठी तीन कोटींचा निधी

आधुनिक केसरी न्यूज

**मनमाड :** शहरातील रेल्वे उड्डाण पुलाचा काही भाग कोसळल्याने इंदुर-पुणे महामार्गावरील मनमाड शहरातून जाणारी वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे. त्यासाठी या उड्डाणपुलाच्या डाव्या बाजूला रेल्वे पुलाच्या पोहच मार्गापर्यंत संरक्षक भिंत बांधण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी तीन कोटी रुपयांचा तातडीचा निधी मंजूर केला आहे. शहरातील इंदूर-पुणे राष्ट्रीय महामार्गावरील रेल्वे उड्डाणपूल खचल्यामुळे या मार्गावरील सर्व वाहतूक प्रशासनाने बंद केली असून त्यामुळे सर्वदूर वाहतुकीची कोंडी होत आहे. प्रामुख्याने रेल्वे जंक्शनमुळे मनमाड येथून शिर्डीकडे जाणाऱ्या प्रवाशांची चांगलीच कोंडी झाली आहे. स्थानिकांचा नेहमीच्या कामासाठी संपर्कही खंडित झाला आहे. प्रामुख्याने रुग्णांना शहरातील विविध रुग्णालयांत आणण्यासाठी कॅम्प येथून गावात येण्यासाठी मोठा वळसा घालावा लागत आहे. नगर, पुणे येथे जाण्यासाठी मनमाडचा मार्गच बंद झाला आहे. त्यामुळे प्रवाशांना 'द्राविडी प्राणायाम' करत लांबच्या मार्गाने म्हणजे नांदगाव किंवा लासलगावमार्गे येवला-नगर-शिर्डी-पुणे असे जावे लागत आहे. नंदुरबार, शहादा, अक्कलकुवा, अमळनेर, धुळे व मालेगाव येथून मनमाडमार्गे पुण्याला जाणाऱ्या सर्व बस सध्या नांदगावमार्गे जात आहेत. म्हणजे वाहतूक वळवल्याने मनमाडला जाणाऱ्या प्रवाशांची मोठी गैरसोय झाली आहे. याप्रश्नी नांदगावचे आमदार सुहास कांदे यांनी मुख्यमंत्री शिंदे, सार्वजनिक बांधकाममंत्री चव्हाण यांची भेट घेतली. मालेगांव, मनमाड, कोपरगांव रस्त्यावरील मनमाड शहरांतून जाणाऱ्या उड्डाण पुलाला संरक्षक भिंत बांधण्यास मंजूरी द्यावी, त्यासाठी तीन कोटी रुपयांची तरतूद करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे केली होती. नागपूर अधिवेशन सुरू असतांना सार्वजनिक बांधकाममंत्री चव्हाण यांनी मालेगांव-मनमाड-कोपरगांव रस्त्यावरील मनमाडमधील रेल्वे पुलाच्या पोहोच मार्गापर्यंत संरक्षक भिंत बांधण्यासाठी तीन कोटींच्या निधीस मंजूरी दिली.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर